अमृत कुंभ

वर्ष ८ | अंक ३ | ऑगस्ट-सप्टेंबर १४ | मूल्य रु. १०/-



१. दिल्ली : केंद्रीय मंत्री माननीय श्री. नितीन गडकरी यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर त्यांच्यासमवेत ब्र. कु. सविता बहेन, फातिमा बहेन व दीपकभाई. **२. अतुल (गुजरात) :** 'बॅलन्स सीट ऑफ लाईफ' या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतांना ब्र. कु. शिवानी बहेन, ब्र. कु. रंजन बहेन, ब्र.कु. रोहितभाई व श्री. सुनिल लालभाई. **३. भोकरदन :** केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचा सत्कार करतांना ब्र.कु. अनिता बहेन व ब्र.कु. लता बहेन. **४. तुर्भे (नवी मुंबई) :** खासदार भ्राता कुँवर हरिवंश सिंह यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र.कु. शीला दीदीसोबत ब्र. कु. मीरा व प्रीती बहेन **५. शांतिवन (आबू रोड) :** श्री श्री १००८ , महामंडलेश्वर, डॉ. शिवलींग शिवाचार्य यांना ईश्वरी संदेश देतांना ब्र. कु. दत्तात्रयभाई (शांतिवन). **६. पणजी (गोवा) :** डयुरा लाइन्स प्रा. लि. च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी आयोजित 'इनर लीडरशिप' यासेमीनारचे प्रसंगी ब्र.कु. डॉ. गिरीश पटेल, ब्र.कु शोभा बहेन व कंपनीचे डायरेक्टर श्री. उदय नायडू **७. बोपोडी (पुणे) :** 'अलविदा डायबिटिज' या कार्यक्रमाचे संयोजक आमदार श्री. विनायक तिम्हण यांना ईश्वरी भेट देतांना बु. कु. सुनिता बहेन व डॉ. श्रीमंत साहूजी. **८. वर्धा :** माननीय श्री. देशमुख, आमदार यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र.कु. माधुरी बहेन व ज्योति बहेन, शेजारी श्री. सुनिल राऊत

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच "मन्मनाभव।''

अमृतकुंभ

वर्ष ८ । अंक ३ । ऑगस्ट-सप्टेंबर २०१४

मुखपृष्ठाविषयी

दादी प्रकाशमणीजी सन १९६९ ते २००७ या कालावधीत संस्थेच्या मुख्य प्रशासिका होत्या. या कालावधीत विश्वातील पाचही खंडात संस्थेचा खूप मोठा विस्तार झाला. सुमारे १३३ देशातून संस्थेची ८५०० हून अधिक सेवाकेंद्रे उघडण्यात आली. दादीजींच्या कुशल नेतृत्वाखाली या संस्थेचा वटवृक्ष संपूर्ण विश्वात पसरला आणि ही संस्था एक आंतरराष्ट्रीय संस्था म्हणून नावारूपाला आली. या संस्थेला बिगर सरकारी संस्था (NGO) म्हणून युनोद्वारे मान्यता प्राप्त झाली. त्याचबरोबर सन १९८६ मध्ये युनोच्या (संयुक्त राष्ट्रसंघाच्या) महासंचिवांनी या संस्थेला 'शांती पुरस्कार' (Peace Award) बहाल केला. अशारीतीने संपूर्ण विश्वात ईश्वरी ज्ञानाचा प्रकाश पसरविण्यासाठी दादीजी निमित्त बनल्या आणि त्यांनी प्रकाशमणी हे आपले नाव सार्थ केले. तसेच त्या त्याग-तपस्या-सेवेची साक्षात मूर्ती होत्या.

दादीजी आनंद, प्रेम, पवित्रता, वात्सल्य, सद्भावना या सर्व गुणांच्या जणू सरिता होत्या. त्यामुळे त्यांचा सहवास सर्वांना आनंद प्रदान करीत असे. त्यांचे चुंबकीय व्यक्तिमत्व सर्वांना आकर्षित करून घेत असे. त्यांच्या सहवासात आत्म्याची बॅटरी जणू चार्ज होत असे. फलस्वरूप प्रत्येकजण शक्ती व खुशीचा अनुभव करीत असे. हाच भाव मुखपृष्ठावरील चित्रात दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. दिनांक २५ ऑगस्ट २०१४ रोजी दादीजींच्या सातव्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त देश-विदेशातील आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम !

-- प्रकाशक, अमृतकुंभ.

वार्षिक वर्गणी रु. ६०/-
अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/-
आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** www.amrutkumbh.com

-- अं त रं ग --

- दादी प्रकाशमणीजींचे अमृत वचन २
- रक्षाबंधन - पवित्रतेचे बंधन (संपादकीय) ३
- दादीजींची आत्मिक दृष्टी व वरदानी हस्त... ५
- दादीजींच्या स्मृतीस करू वंदन (कविता) ६
- नवरात्रीचे आध्यात्मिक रहस्य ६
- श्रीकृष्ण जन्माष्टमी ७
- ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था... ८
- ईश्वरी सेवा हाच खरा परीस ११
- खऱ्या व खोट्या हिऱ्याची पारख १२
- सोळा हजार एकशे आठच्या माळेचेही असाधारण महत्व १३
- परमात्म शक्तीद्वारे महापरिवर्तनाचा समय १७
- ज्ञानबीजाला स्नेहाचे पाणी द्या २०
- अमृतवेळी अमृतकुंभ देतसे (कविता) २०
- जेथे व्यर्थ तेथे अनर्थ २१
- विघ्नातूनच सफलतेची प्राप्ती २५
- आपुल्या सत्कर्माची गाथा, करी परमात्म प्रत्यक्षता २७
- माझी भक्ती फळा आली (अनुभव) ३१

फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail :info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता : बी.के.गोदावरी,
प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु.मनिषा गोवळकर, ८ श्रीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

दादी प्रकाशमणीजींचे अमृत वचन
(एकमत होऊन राहा व एकरस स्थिती बनवा)

शिवबाबा आपल्याला पाहून हर्षित होतात कारण आपण त्यांना ओळखले आहे. आपण आत्म्यांनी त्यांच्याशी सर्व संबंध जोडले आहेत. आत्म्याचे सर्व संबंध एकाशीच आहेत. देहाचे संबंध मात्र अनेकांशी आहेत. त्यामुळे लौकिक आई-वडिल वेगळे आहेत. पती, बंधु, सखा हे भिन्न-भिन्न आहेत. आई-वडिलांना कोणी पति अथवा मुलाच्या संबंधाने पहाणार नाही. **परंतु योगी तू आत्म्याचे सर्व संबंध एक शिवबाबांशी आहेत. त्यामुळे आपण एकाचे आहोत. आपले प्रत्येकाचे सर्व संबंध एकाशीच आहेत. फलस्वरूप आपण सर्व एक आहोत.** म्हणूनच आपण जेव्हा अमृतवेळेला उठतो तेव्हा प्रथम स्वतःला विचारा की माझे सर्व संबंध एक शिवबाबांशी आहेत का? तोच माझा पिता, टीचर व सद्गुरु आहे. दुसरा कोणीही नाही. ब्राह्मण परिवार देखील एकाचाच आहे. सर्वजण एकाचेच आहेत. शिवबाबांनाच सर्वांनी आपले बनवले आहे. तोच सर्वांना संपूर्ण अधिकार प्रदान करतो.

हे मोठे आश्चर्य आहे की तो कधी असे म्हणत नाही की तू माझा मोठा मुलगा आहेस म्हणून तुला जास्त अधिकार देईन, तू लहान मुलगा आहेस म्हणून तुला कमी देईन. तो सर्वांना एकच शिक्षण देतो; एकच अधिकार देतो. त्याने सर्वांसाठी सारखेच राजयोगी जीवनाचे नियम आणि मर्यादा सांगितल्या आहेत. त्यामुळे संगमयुगात आपणा सर्वांना एकसारखीच पालना प्राप्त आहे.

शिवबाबांनी आपणा सर्वांना एक मंत्र दिला आहे - एकमत, एकरस व एकॉनामी (बचत). हा मंत्र तर सर्वांच्या लक्षात असेलच त्यामुळे स्वतःला विचारा की आपण एकमत आहोत का? जेथे एकमत आहे तेथे कुठलेही द्वैत नाही, द्वेष नाही, राग नाही. याउलट जेथे भेद आहेत तेथे भांडणतंटे आहेत. परंतु आपण सर्व ब्रह्मावत्स एकाचे असल्याने कुठलाही भेद नाही, ईर्ष्या नाही, द्वेषभावना नाही, वैर विरोध नाही. अशाप्रकारे जेथे एकता आहे तेथेच ईश्वर आहे. आपल्यात एक शिवबाबा असल्याने कधीच दुमत नसले पाहिजे. परंतु जेव्हा मला आपसातील दोन मते ऐकायला मिळतात तेव्हा रामायणाची आठवण होते. रामायण तेव्हाच घडते जेव्हा द्वैत निर्माण होते. रामायणातील मंथरा ही कैकयीची बुद्धी भ्रष्ट करून टाकते, तिच्यात द्वैतभाव निर्माण करते. परिणामतः श्रीरामाला वनवासात जावे लागते व राजा दशरथाचा मृत्यु होतो. तात्पर्य म्हणजे जेव्हा द्वैतभाव निर्माण होतो तेव्हा एवढी मोठी कहाणी घडते.

आपली स्थिती एकरस रहाण्यासाठी सदैव लक्षात ठेवा 'एक बाप दुसरा कोणी नाही.' एक शिवबाबांमध्ये लवलीन रहा. आपली स्थिती एकरस न रहाण्याचे कारण म्हणजे आपण शिवबाबांच्या आठवणीत सामावून जात नाही. एक शिवबाबांच्या आठवणीत राहिल्याने तो एकच आपल्याला प्रिय वाटेल. सर्व संबंधांचा रस एक शिवबाबांकडूनच प्राप्त होत राहिल. तसेच सर्व शक्तींचा, सर्व गुणांचा रस भरणारा एक शिवबाबाच आहे. त्यामुळे सदैव त्याच्यातच सामावून राहा म्हणजे जरासुद्धा मोह-ममता शिल्लक रहाणार नाही. कुठल्याही प्रकारचा रस आपल्याकडे आकर्षित करणार नाही.

अजूनही कित्येकांना कनरस आकर्षित करतो, कोणाला जीभेचा रस, कोणाला मुखाचा रस, कोणाची बुद्धी दुसऱ्याच्या सौंदर्याकडे जाते. त्याच्या डोळ्यांना दुसऱ्याचा चेहरा दिसतो परंतु चरित्र दिसत नाही. वास्तविक शिवबाबांनी आपल्याला समजावून सांगितले आहे की कानांनी मधुर बोल ऐका परंतु दुसऱ्या गोष्टी ऐकू नका. परचिंतन तर कधीच ऐकू नका. कोणी म्हणतो की कधी-कधी माझ्या मुखावाटे कटुवचन निघतात, कधी दृष्टी खराब होते. हे ऐकून मला फार वाईट वाटते कारण आपण महान आत्मे आहोत, आपल्याला शिकविणारा सुप्रीम टीचर परमात्मा आहे. असे असतांना एखाद्याची दृष्टी जेव्हा खराब होते किंवा मुखाद्वारे कटुवचन बाहेर पडतात तेव्हा हा ईश्वरी नशा कुठे जातो? **त्यामुळे सदैव लक्षात ठेवा की आपण या दुनियेला चॅलेन्ज (आव्हान) दिले आहे की आम्ही नवीन दुनिया, नवीन राज्य स्थापन करीत आहोत. आम्ही जुन्या सर्व गोष्टी सोडल्या आहेत. आम्ही बेहदचे त्यागी, बेहदचे वैरागी आहोत. त्यामुळे सदैव एक शिवबाबांच्या स्मृतीत राहून, एकरस स्थितीचा अनुभव करा.**

❖❖❖

संपादकीय..

रक्षाबंधन - पवित्रतेचे बंधन

दरवर्षीप्रमाणे यावेळी देखील रक्षाबंधनाचा उत्सव भारतात मोठ्या उत्साहाने साजरा केला जाईल. घरा-घरात बहिणी आपल्या भावाला हातावर अतिशय सुंदर अशी राखी बांधतील. आपल्या भावाचे तोंड गोड करतील. जर बहिण भावापासून दूर शहरात रहात असेल तर भावाला राखी पाठवून आपले पवित्र प्रेम प्रगट करेल. अशाप्रकारचे परंपरागत पद्धतीने रक्षाबंधन साजरे केल्यामुळे, आज भाऊ केवळ आपल्या बहिणीचे रक्षण करण्याचे बंधन पाळण्याचा प्रयत्न करतो. परंतु दुसऱ्या स्त्रियांविषयी त्याची दृष्टी-वृत्ती तितकीशी पवित्र नसते. त्यामुळे समाजात दिवसेंदिवस स्वैराचार, पापाचार, भ्रष्टाचार झपाट्याने वाढत चालला आहे. परिणामतः स्त्रियांचे जीवन अधिक असुरक्षित होत चालले आहे. सरकारदेखील त्यांना सुरक्षितता प्रदान करण्यासाठी निरनिराळ्या उपाययोजना कार्यान्वित करित आहे. परंतु एवढं करूनही स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. याविषयीच्या अनेक बातम्या आपण दैनंदिन वृतपत्रातून तसेच टी.व्ही.वर पहात असतो. **अशाप्रकारचे समाजाचे नैतिक अधःपतन होण्याचे मुख्य कारण म्हणजे रक्षाबंधन हे केवळ घरगुती पातळीवर केले जाते. त्यातील आध्यात्मिक रहस्याचा आज पूर्णतः विसर पडला आहे. वास्तविक भारत सरकारने रक्षाबंधनाला पवित्रतेचे बंधन या रूपाने एक राष्ट्रीय महोत्सव म्हणून साजरे केले पाहिजे.** हा उत्सव केवळ हिंदूंनीच नाही तर सर्व धर्मातील बंधु-भगिनींनी पवित्रतेच्या रक्षणार्थ साजरा केला पाहिजे.

❑ रक्षाबंधन हे तर पवित्रतेचे बंधन

रक्षाबंधन अर्थात अपवित्रतेपासून (अर्थात पाच विकारां-पासून) आत्म्याची रक्षा करण्यासाठी बांधले जाणारे पवित्रतेचे बंधन. यामुळे आपल्या हृदयातील सर्व वाईट वासना बहिष्कृत होतात. वास्तविक रक्षाबंधन भावा-बहिणीतील पवित्र प्रेम व संबंधांची मधुर स्मृती देणारा उत्सव आहे. **निराकार परमपिता शिव परमात्मा तसेच प्रजापिता ब्रह्माबाबांची आपण मुले असल्याने, सर्वजण (जीवात्मे) आपापसात भाऊ-बहिण आहोत. त्यामुळे आपले संबंध अतिशय प्रेमपूर्ण, मधुर व पवित्र असले पाहिजेत. परंतु आत्मविस्मृती व कलियुगातील अति धर्मग्लानीमुळे, मनुष्य आपल्या खऱ्या संबंधांना व स्वभावाला विसरला आहे.** काम-क्रोधादी विकारांच्या वशीभूत होऊन तो आपली आत्मिक शक्ती गमावून बसला आहे. परिणामतः तो अत्यंत दुःखी आणि अशांत बनला आहे. भोगविलासिता आणि वासना यांच्या महापूरात तो बुडत चालला आहे.

अशा समयी पावन, सतोप्रधान, सत्ययुगी राजधानीची पुनर्स्थापना करण्यासाठी, रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर संपूर्ण पवित्रतेचा ईश्वरी संदेश, जन-जनपर्यंत प्रजापिता ब्रह्माकुमारीज् संस्थेद्वारे दिला जातो. सर्वांना पूर्व काळातील सत्ययुगी पावन सृष्टीचा परिचय करून दिला जातो. **त्यांना हे समजावून सांगितले जाते की काम-विकार हाच मानवाचा परम शत्रू आहे. त्यापासून मुक्त होण्यासाठी पवित्रतेचे बंधन बांधणे अति आवश्यक आहे. त्याद्वारे मन सात्विक बनेल. दृष्टी-वृत्ती व कृती शुद्ध होईल.** जीवनात अविनाशी सुख-शांती प्राप्त होईल कारण पवित्रता ही सर्व गुणांची जननी आहे. पवित्रता हाच आत्म्याचा सर्वश्रेष्ठ शृंगार आहे. पवित्रतेवाचून मनुष्याचा स्वभाव दैवी बनू शकत नाही. तसेच विश्वात दैवी स्वराज्य देखील स्थापन होऊ शकत नाही. पवित्रतेच्या जोरावरच आपल्या पूर्वजांनी (अर्थात देवी-देवतांनी) मृत्युवर विजय प्राप्त करून अमर देवपद प्राप्त केले होते.

या अनुषंगाने एक पौराणिक कथा आहे की यमाने आपली बहिण यमुनाकडून पावन राखी बांधली व तिला वचन दिले की हे पवित्र बंधन बांधणारा मनुष्य यमदूतांच्या भयापासून मुक्त होईल. दुसरी कथा अशी आहे की जेव्हा देवराज इंद्राला असुरांनी युद्धात हरवले तेव्हा त्याला आपले स्वर्गाचे राज्य गमवावे लागले. त्यानंतर इंद्राणीने इंद्राला पावन राखी बांधली. फलस्वरूप इंद्राला आपले गमावलेले

दैवी स्वराज्य पुन्हा प्राप्त झाले. परंतु आज आपण पहातो की रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने साजरे करूनही कोणी यमदूतांच्या भयापासून मुक्त होत नाही. उलट चोहिकडे दुःख, दरिद्रता, अकाले मृत्यु, दुष्काळ, महागाई, बेरोजगारी अशा अनेक कारणांमुळे सर्वत्र हाहाःकार दिसून येत आहे. याला मुख्य कारण म्हणजे मनुष्य आत्म्यातील अपवित्रता (अर्थात काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार या पाच विकारांचे प्राबल्य) म्हणूनच आज खरी आवश्यकता आहे ती रक्षाबंधनाचे आध्यात्मिक रहस्य जाणून, पवित्रतेचे बंधन बांधण्याची. याद्वारेच अवघे विश्व पुन्हा नंदनवन (स्वर्ग) बनेल. या अनुषंगाने एका कवीने म्हटले आहे -

रक्षाबंधन पवित्र बंधन, बांधून सारे व्हा निर्बंधन।
पवित्रतेच्या या शक्तीने, विश्व होई पुन्हा नंदनवन।।

❒ परमात्मा कोणते रक्षाबंधन बांधतात?

आज एक रिवाज म्हणून बहिण आपल्या भावाला अथवा स्त्री एखाद्या पुरुषाला यासाठी राखी बांधते की त्याने आपली रक्षा करावी. परंतु परमात्मा शिव पिता रक्षाबंधनाचे पर्व जन-कल्याणासाठी साजरे करतात. **ते धर्मग्लानीच्या वेळी अवतरित होऊन, नर आणि नारी दोघांना पवित्रतेचे बंधन बांधतात. ते आत्म्यांना बंधन बांधतात अर्थात त्यांना वचनबद्ध करतात की काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकाररूपी मायेपासून (अर्थात अपवित्रते-पासून) मी स्वतःची रक्षा करेन.** अशाप्रकारे जे नर-नारी रक्षाबंधन बांधतात ते पवित्रतेची रक्षा करण्यासाठी वचनबद्ध होतात. आपल्या मन-वचन-कर्मावर कुठल्याही विकाराचा वार होऊ न देण्याचे पावन व्रत ते घेतात. त्यामुळे ते अशुद्ध आहार, व्यवहार, विचार इत्यादींपासून स्वतःचे रक्षण करतात.

अशाप्रकारचे ईश्वरी रक्षाबंधन केवळ प्रजापिता ब्रह्माकुमारीज् तर्फे संपूर्ण विश्वभरात केले जाते. सर्व आत्म्यांना पवित्रतेचा संदेश प्रदान करून ईश्वरी स्नेहसूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला जातो. या संस्थेच्या सुमारे ८५०० सेवाकेंद्राद्वारे ठिकठिकाणी रक्षाबंधनाचे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केले जातात. सदरचे कार्यक्रम फक्त त्या दिवसा-पुरते मर्यादित नसून एक आठवडा, एक पंधरवडा, एक महिन्यापर्यंत साजरे केले जातात. **तात्पर्य म्हणजे रक्षा-बंधनाद्वारे संपूर्ण विश्वात बंधुत्वाची भावना पसरविणारी ही एकमेव आध्यात्मिक संस्था आहे. याला कारण म्हणजे ही संस्था स्वयं परमात्मा पित्याने, आत्मारूपी सर्व मुलांच्या कल्याणासाठी स्थापन केली आहे.** येथे कुठल्याही प्रकारचे जाती, धर्म, भाषा, संस्कृती, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत इत्यादी भेद नाहीत. अशा संस्थेत येऊन रक्षाबंधन बांधणे म्हणजे जणू अविनाशी सद्भाग्य आपल्या गाठीशी बांधण्या-सारखे आहे. म्हणूनच रक्षाबंधन पर्व हे खऱ्या अर्थी पुण्य प्रदायक पर्व होय.

❒ भारताला स्वर्ग बनविणारे रक्षाबंधन

जो मनुष्य आत्मा रक्षाबंधन अर्थात पवित्रतेचे बंधन बांधतो, त्याचा सहाय्यक स्वयं परमात्मा बनतो. या अलौकिक रक्षाबंधनाद्वारेच परमात्मा, कलियुगी पतित भारताला पुन्हा पावन बनवितात. **फलस्वरूप भारत देश पुन्हा स्वर्ग बनतो. (म्हणूनच परमात्म्याला स्वर्गाचा रचयिता असे म्हटले जाते.) असे हे पवित्रतेचे बंधन माया अर्थात पाच विकारांच्या बंधनातून मुक्त करणारे आहे. मनुष्याला खऱ्या अर्थी निर्बंधन बनविणारे आहे. म्हणूनच रक्षाबंधन प्रत्येक आत्म्याला प्रिय आहे,** त्यात स्वतःला बांधून घेणे हे त्याला आवडते कारण यातच त्याचे परमहित वा परम कल्याण सामावलेले आहे. याद्वारेच विश्वात आध्यात्मिक क्रांती घडून येईल व संसार सुखमय बनेल. एवढे अनन्य साधारण महत्व आहे रक्षाबंधन पर्वाचे!

सारांशाने हे लक्षात ठेवा की वर्तमान समय हा संगम-युगाचा आहे. याच वेळी आत्मा पुरुषोत्तम अर्थात उत्तम पुरुष बनतो. त्यासाठी परमात्मा शिव पिता सृष्टीवर अवतरित होऊन, आत्म्यांना रक्षाबंधन अर्थात पवित्रतेचे बंधन बांधत आहेत. याद्वारेच आत्मा पावन देवता बनून, स्वर्गीय पावन दुनियेत राज्यअधिकारी बनेल. हाच भाव पुढील काव्य-पंक्तीत अतिशय सुंदर रीतीने मांडण्यात आला आहे.

श्रेष्ठ वेळ ही कल्पांतीची, संगमयुग ही महती त्याची।
याच समयी शिव परमात्मा, देई प्रतिज्ञा पावित्र्याची।
याच स्मृतीचा आहे हा सण, रहस्य याचे घ्या समजावून।।

दादीजींची आत्मिक दृष्टी व वरदानी हस्त - जीवन परिवर्तनाचा आधार

ब्र.कु.दिलीप राजकुळे, माउंट आबू.

दादी प्रकाशमणीजी सन १९६९ ते २००७ या कालावधीत प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाच्या मुख्य प्रशासिका होत्या. त्यांनी ३९ वर्षाच्या या कालावधीत सुमारे १३३ देशातील बंधुभगिनींना ईश्वरी संदेश प्रदान करण्याचे कार्य केले. दिव्य आणि ओजस्वी व्यक्तिमत्व असणाऱ्या त्या महान विभूती होत्या. दादीजींना ज्यांनी पाहिले त्यांना दादींकडून आईची भासना मिळत असे. त्यामुळे सर्वजण त्यांना 'दादी माँ' म्हणत असत. सर्वांची आपुलकीने व आपलेपणाने काळजी करणाऱ्या त्या साऱ्या जगताची आई होत्या. त्यामुळे प्रत्येकाला दादी आपल्या वाटत असत. त्यांचे हृदय अतिशय विशाल होते. त्यांची आपलेपणाची भावना प्रत्येक आत्म्याला प्रभावित करीत असे. दादीजींनी एवढ्या मोठ्या संस्थेचे संचालन केले परंतु त्यांच्या चेहऱ्यावर चिंतेची छटा कधीही दिसली नाही. याउलट त्यांना पाहता क्षणीच सर्वांना आपल्या दुःखाचा विसर पडत असे. **दादीजींच्या या तणावमुक्त जीवनाचे रहस्य हेच होते की त्यांच्यात निमित्तभाव होता. आपण केवळ निमित्त मात्र आहोत. कर्ताकरविता शिवबाबा आहे. अशा पवित्र, निर्मळ, ओजस्वी, तेजस्वी दादीजींचा सहवास म्हणजे जणू परीसस्पर्शाप्रमाणे होता ज्यामुळे लाखो आत्म्यांच्या जीवनात अद्‌भूत परिवर्तन घडून आले.** माझा देखील हाच अनुभव आहे.

सन १९९२ मधील ही घटना आहे. दादीजी रेल्वेने नागपूरहून मधुबनला चालल्या होत्या. रस्त्यात भुसावळ स्टेशनला अर्धा तास गाडी थांबणार होती. त्यामुळे स्टेशनवर दादीजींना भेटण्यासाठी सुधा दीदींच्या समवेत आम्ही बरेच ब्रह्मावत्सदेखील आलो होतो. दादीजींची अलौकिक आत्मिक दृष्टी आपल्याला मिळावी, हाच आमचा सर्वांचा उद्देश होता. गाडी स्टेशनला पोचल्यावर आम्ही सर्वांनी दादीजींचे स्वागत केले. दादीजी प्लॅटफॉर्मवर एका प्लॅस्टिकच्या खुर्चीवर येऊन बसल्या. त्यांच्यासमोर काही जण सतरंजीवर बसले व काहीजण त्यांच्या सभोवती उभे राहिले. त्यामुळे प्लॅटफॉर्मला क्लासचे स्वरूप प्राप्त झाले. दादीजींच्या समोर स्वागतपर एक गीत गायची संधी मला मिळाली होती. मी मोठ्या भावपूर्ण रीतीने गीत गायले. दादीजींना ते खूप आवडले. त्यानंतर दादीजींनी मला टोली (प्रसाद) दिला व शक्तिशाली दृष्टी दिली. त्याचबरोबर दृष्टी देताना दादीजी म्हणाल्या, 'मधुबन जरूर आना'. दादीजींचे हे महावाक्य माझ्यासाठी वरदान बनले व आज गेल्या १९ वर्षापासून मी मधुबनमध्ये सेवारत आहे. अशारीतीने दादीजींची अलौकिक दृष्टी व वरदानी बोल, माझ्या जीवन परिवर्तनाचा आधार बनले. आणखी एक प्रसंग याठिकाणी नमूद करावासा वाटतो.

सन १९९५ मध्ये दिवाळीच्या दिवशी 'ॐ शांती भवन' मध्ये दादीजी सर्व ब्रह्मावत्सांना भेटत होत्या. **तेव्हा मलाही दादींनी दृष्टी दिली व माझा हात हातात घेतला. त्यावेळी माझ्या तन-मनात अलौकिक शक्तीचा संचार होत असल्याचा मला अनुभव आला. अजूनही तो अनुभव मी विसरू शकलो नाही.** त्याक्षणी मला अतींद्रिय सुखाचा, अशरीरी स्थितीचा व सर्वशक्ती संपन्न स्थितीचा अनुभव झाला. तेव्हापासून माझा हा विश्वास दृढ झाला की सर्व शक्तिवान शिवबाबांचा हात व साथ (सोबत) मला प्राप्त आहे. अजूनही जेव्हा मी अव्यक्त बापदादांना स्टेजवर सन्मुख भेटायला जातो तेव्हा तसाच अनुभव मला होतो. मधुबनमध्ये दरवर्षी दादीजी राखी बांधताना देखील प्रत्येकाचा हात हातात घेऊन, त्याला शक्तिशाली दृष्टी देत असत. तेव्हा अक्षरशः अंगावर रोमांच उभे रहात असत.

तात्पर्य म्हणजे दादीजींची अलौकिक दृष्टी मानवमात्राच्या जीवनाला सुखी आणि आध्यात्मिक बनविणारी होती. दादीजींमध्ये अतिशय विनम्रता होती. त्यामुळे साधु-संत, महामंडलेश्वर, अन्य धर्माचे नेतेसुद्धा दादीजींचा मनापासून

सन्मान करीत असत.

दादीजी निमित्त, निर्मान व निर्मळ होत्या. त्यांचे व्यक्तित्व प्रभावशाली, सदा प्रसन्न व शक्तिशाली होते. त्यांच्या जीवनात सत्यता होती. त्यामुळे त्यांच्यासमोर कोणीही असत्य बोलू शकत नसे. त्यांच्यासमोर आल्यावर त्यांच्या आत्मिक दृष्टीने प्रभावित होऊन प्रत्येक जण स्वतःला बालक अनुभव करीत असे. त्यांच्या मुखकमलाद्वारे सदैव उमंग-उत्साहाचे बोल निघत असत. फलस्वरूप प्रत्येक ब्रह्मावत्सामध्ये तसेच सर्व सेवाकेंद्रात उमंग-उत्साहाची लहर पसरत असे. याचे प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे त्यांच्या कारकिर्दीत ज्ञानसरोवर, शांतिवन, ग्लोबल हॉस्पिटल, पीस पार्क असे अनेक प्रोजेक्ट अगदी थोड्या कालावधीत पूर्ण होऊन कार्यान्वित झाले. **दादीजींचे पाऊल जेथे पडत असे तेथील वातावरण शुद्ध, अलौकिक व शक्तिशाली होऊन जात असे. अशा वात्सल्यमूर्ती, त्याग-तपस्या-सेवेची मूर्ती, बापसमान संपन्न आणि संपूर्ण आदरणीय दादीजींच्या पुण्यस्मृतीला आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम !**

❖❖❖

दादीजींच्या स्मृतीस करू वंदन

प्रकाशमणी दादीजींच्या, स्मृतीस करू वंदन।
शिवयज्ञाच्या सेवेसाठी, झिजले जणू चंदन।। धृ।।
विश्वविद्यालय ही त्यांची, कर्मभूमी होती।
सदोदित त्या झटल्या, त्यास्तव दिवसराती।
पिताश्रींना जे वचन दिले ते केले त्यांनी पूर्ण।
शिवयज्ञाच्या सेवेसाठी, झिजले जणू चंदन।। १ ।।
सेवाभावी राजयोगिनी, वात्सल्यतेची मूर्ती।
ज्ञानामृत पाजूनी सकळा, केली सेवा पूर्ती।
'युनो'नेही केले सन्मानित, सेवा ती पाहून।
शिवयज्ञाच्या सेवेसाठी, झिजले जणू चंदन।। २ ।।
नष्टोमोहा स्मृतिर्लब्धा, झाल्या त्या जीवनी।
शिवबाबांच्या स्मृतीतच, देह त्यागिला त्यांनी।
स्मृतीदिनी त्यांच्या, करू या श्रद्धांजली अर्पण।
शिवयज्ञाच्या सेवेसाठी, झिजले जणू चंदन।। ३ ।।

(*संदर्भ : ब्र. कु. गौतम सुत्रावे रचित काव्यसंग्रह*)

नवरात्रीचे आध्यात्मिक रहस्य

नवरात्री या शब्दातील रात्री या शब्दाचा अर्थ आहे, कलियुगातील अज्ञान अंधःकार अथवा तमोगुणाची वृद्धी. अशा या कलियुगाच्या अज्ञान रात्री परमात्मा शिवपिता आत्मारूपी मुलांना अज्ञान निद्रेतून जागवतो व सत्ययुगी नवप्रभात लवकरच होणार असल्याची सुवार्ता देतो. एवढंच नव्हे तर तेथे जाण्यासाठी पतित आत्म्यांना पावन बनवतो.

नवरात्रीचा काळ हा संगमयुगाचे (कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांचा संधीकाळ) प्रतीक आहे. याचवेळी परमपिता शिव परमात्मा, मनुष्य आत्म्यांना (विशेषतः कन्यांना) ज्ञान, योग, दिव्यगुण व शक्तींनी सुसज्जित करतो त्यांना ज्ञानाचा तिसरा नेत्र प्रदान करतो. याच त्या ब्रह्माकुमारी (प्रजापिता ब्रह्माबाबांच्या मानसपुत्री) भगिनी अथवा शिवशक्ती, विश्वातील सर्व आत्म्यांना ईश्वरी ज्ञान प्रदान करण्यासाठी निमित्त बनतात आणि विश्वातील सर्व आत्म्यांना आसुरी वा दुष्ट प्रवृत्तींचा संहार करण्यासाठी प्रोत्साहित करतात. याचेच प्रतीक म्हणून नवरात्रीच्या प्रारंभी ज्ञान-कलशाची स्थापना (घटस्थापना) करतात आणि ज्या शिवशक्तींनी त्यांना तमोगुणाशी लढण्यासाठी जागवलं, त्यांच्या स्मृतीत जागरण करतात. तसेच योगाद्वारे आत्मिक प्रकाश प्राप्त होतो. याचे प्रतीक म्हणून नवरात्रीत अखंड दीप लावतात. त्याचबरोबर ब्रह्माकुमारींच्या महान कर्तव्यामुळे प्रत्येक वर्षी नवरात्रीत कन्या-पूजन करण्यात येते आणि दुर्गा, सरस्वती आदी देवींच्या पुढे प्रार्थना केली जाते की, 'हे अंबे, हे माते, माझी ज्योति जागव व मला अशी शक्ती प्रदान कर की माझ्या अंतरातील अधःकार दूर होईल.' वास्तविक आत्मज्योति जागवणं हेच खऱ्या अर्थी नवरात्री साजरे करणे होय.

वर्तमान संगमयुगात स्वयं परमात्मा सृष्टीवर अवतरित होऊन, मनुष्य आत्म्यांना पुन्हा शिवशक्ती स्वरूप बनविण्याचे महानतम कर्तव्य करीत आहेत. त्यामुळे या समयाला ओळखा व स्वतःही शिवशक्ती स्वरूप बनण्याचा पुरुषार्थ करा. राजयोगाच्या अभ्यासानेच मनुष्य आत्मा शिवशक्तीस्वरूप बनतो ज्याचे गायन-पूजन भक्तिमार्गात केले जाते. ❖❖

श्रीकृष्ण जन्माष्टमी

ब्र.कु.बालूभाई, शांतिवन (आबू रोड).

भारतवासी श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा करतात. श्रीकृष्णाच्या जीवनाची ही विलक्षणता होती की ते धार्मिक क्षेत्रात तसेच राजनीतिच्या क्षेत्रात अत्यंत प्रभावशाली होते. त्यामुळे श्रीकृष्णाच्या चित्रात व मंदिरात त्यांच्या मस्तकाभोवती दिव्य प्रभामंडळ (प्रकाशाचा मुकुट व शिरी रत्नजडित स्वर्णमुकुट) दर्शविण्यात येतो. मुख्य म्हणजे ते दोन्ही मुकुट त्यांना जन्मतःच दर्शविले जातात. असा एकही धर्मनेता वा राजनीतिक नेता नाही की ज्याला हे दोन्ही मुकुट जन्मतःच प्राप्त होते. त्याचबरोबर अशी एकही महान व्यक्ती नाही जी धार्मिक व राजनीतिक दोन्ही क्षेत्रात प्रभावशाली होती. त्यामुळे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव हा खरोखरच अद्वितीय असा महोत्सव आहे कारण श्रीकृष्णाला राजे पूजतात तसेच महात्मेही पूजतात. दुसरी गोष्ट म्हणजे आपण ज्या महान पुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करतो त्यापैकी कोणीही १६ कला संपूर्ण नव्हते. केवळ **श्रीकृष्ण हेच १६ कला संपूर्ण देवता होते. श्रीकृष्णामध्ये शारीरिक आरोग्यता, सुंदरता, आत्मिक बळ, पवित्रता व दिव्य गुणांची अत्यंत पराकाष्ठा होती. त्यामुळे मनुष्य देहात जो सर्वोत्तम जन्म होऊ शकतो, तो त्यांचा होता.**

❒ श्रीकृष्ण भगवान नव्हते, देवता होते

आज बरेच लोक श्रीकृष्णाला भगवान मानतात. याचे कारण असे असू शकेल की त्यांच्या दृष्टीने महात्मा लोक तर मोठे झाल्यावर साधना अथवा पुरुषार्थ करून महान बनतात त्यानंतर त्यांना प्रकाशाचा मुकुट प्राप्त होतो. परंतु श्रीकृष्ण तर जन्मापासूनच महान होते. त्यांना जन्मतःच दुहेरी मुकुट (प्रकाशाचा व राजाईचा) प्राप्त होते. असे असले तरी श्रीकृष्णाला भगवान म्हणणे चुकीचे आहे. यासाठी लोकांनी हे समजून घेतले पाहिजे की सुंदर तन, स्वस्थ मन, अपरिमित धन, वैकुंठीचे राज्यभाग्य हे सर्व काही मनुष्याला पुरुषार्थाच्या प्रालब्ध रूपानेच प्राप्त होत असते. परंतु परमात्मा तर कर्म आणि त्याचे फळ तसेच जन्म आणि मृत्यु यापासून सदा अलिप्त (न्यारा) आहे. **मुख्य म्हणजे परमात्मा निराकार ज्योतिर्बिंदूस्वरूप आहे. त्यालाच विभिन्न धर्मात शिव ज्योतिर्लिंगम्, ॐकार, अल्लाह, गॉड, जेहोवा इत्यादी नावांनी संबोधले जाते.** तसेच तो परमधामनिवासी आहे. सर्व आत्म्यांचा पिता आहे. सर्व देवी-देवतांचा तो रचयिता आहे. तो सत्य आहे, शिव (अर्थात कल्याणकारी) आहे व सुंदर आहे. यावरून आपल्या हे लक्षात आले असेल की श्रीकृष्ण श्रेष्ठतम देवता होते, भगवान नव्हते. परंतु भक्तिमार्गात ज्याला ज्याची भक्ती आवडली त्याला भक्त भगवान म्हणू लागतो. या अनुषंगाने समर्थ रामदासांचा एक सुंदर श्लोक आहे -

जया मानला देव तो पूजिताहे।
परी देव शोधूनी कोणी न पाहे।
जगी पाहता देव कोट्यानुकोटी।
जया मानली भक्ती जे तेचि मोठी।। १८०।।

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे श्रीकृष्ण व परमात्मा यांच्या कर्तव्यात बरीच समानता आहे. त्यामुळे देखील लोकांनी श्रीकृष्णाला भगवान समजले असावे. कारण परमात्म्याचे एक कर्तव्य आहे, सृष्टीची पालना करणे व विष्णु अथवा त्याचे साकार रूप श्रीकृष्णाचे कर्तव्य देखील सृष्टीची पालना हेच आहे. त्यामुळे लोकांनी श्रीकृष्णाला भगवान समजण्याची चूक केली असावी. **वास्तविक भगवान तर ब्रह्मा, विष्णू व शंकर या त्रिदेवांचा रचयिता शिव आहे. त्यामुळे त्यांचे कर्तव्य केवळ सत्ययुगी सृष्टीची पालना हे नसून, त्याची स्थापना तसेच कलियुगी सृष्टीचा महाविनाश हे देखील आहे. आता भगवान शिव आपली दोन्ही कर्तव्ये प्रजापिता ब्रह्मा व महादेव शंकराद्वारे करवित आहेत.** तसेच निकट भविष्यात होणाऱ्या ॲटॉमिक महायुद्ध व महाविनाशानंतर सत्ययुगी सृष्टीच्या प्रारंभी पुन्हा श्रीकृष्ण लवकरच येणार आहे. त्यावेळीच भारतभूमी ही पुन्हा स्वर्गभूमी बनेल. याचेच गायन आजही केले जाते - जहाँ डाल-डालपर सोने की चिडियाँ करती बसेरा, वो भारत देश है मेरा। ❖❖❖

ब्रह्मावत्सांकरिता...

ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

(भाग -२)

ब्र.कु.रमेश शाह, मुंबई (गावदेवी).

गेल्या अंकातील लेखात मी नमूद केले होते की ईश्वरी ज्ञानाच्या चार विषयांसह पाचवा विषय व्यवस्थापन (management) सुद्धा खूप जरूरी आहे. शास्त्रांमध्ये असे लिहिले आहे की, प्रत्येक आत्म्याला चार आश्रमांतून जावे लागते - ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यासाश्रम. मनुःस्मृतीमध्ये लिहिले आहे की सर्वांनाच या चारही आश्रमातून जावे लागते असे नाही. काही असे तीव्र पुरुषार्थी असतात की ते ब्रह्मचर्यातून सरळ संन्यासाश्रमामध्ये जाऊ शकतात. **अशाप्रकारे आपल्या दैवी परिवारातील असे काही भाऊ-बहिणी असतील जे उपरोक्त चारही विषयांमध्ये असा श्रेष्ठ पुरुषार्थ करतील की त्यांना व्यवस्थापन या पाचव्या विषयावर फारसे लक्ष देण्याची गरज पडणार नाही. पण जे एवढे तीव्र पुरुषार्थी नसतील तर त्यांना पुढे जाण्यासाठी, राज्यअधिकारी बनण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यवस्थापन या विषयाची आवश्यकता असेल.**

भारत स्वतंत्र झाला होता तेव्हा भारतात व्हॉईसरॉयच्या रूपात लॉर्ड माउंटबॅटन होते तर प्रधानमंत्रीच्या रूपात पंडित जवाहरलाल नेहरू होते. भारत स्वतंत्र होत असताना अनेक प्रकारचे दंगे होऊन त्यात हजारो लोक मारले गेले, रक्ताच्या नद्या वाहिल्या असे म्हटले जाते. त्याचा समाचार दिल्लीच्या केंद्रीय सरकारकडे पोहचताच त्यांनी दंगे थांबविण्याचा खूप प्रयत्न करूनही त्यांना त्यात यश मिळाले नाही. रविवारच्या दिवशी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मंत्रिमंडळाची आपद्कालीन बैठक बोलाविली आणि सर्वत्र होत असलेल्या दंग्याच्या स्थितीवर तेव्हा विचारविमर्श करण्यात आला. पोलिस दलसुद्धा दंग्यावर नियंत्रण करण्यात अपयशी ठरले होते. म्हणून मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला की सर्व मिळून लॉर्ड माउंटबॅटनला निवेदन करूया की त्यांनी सत्तेची सूत्र आपल्या हाती घेऊन स्थिती नियंत्रणा-खाली आणावी व त्याचदिवशी दुपारी ४ वाजता मंत्रिमंडळाचे सारे सदस्य लॉर्ड माउंटबॅटन यांच्याकडे जाऊन त्यांनी आपल्या हाती सत्तेची सूत्रे घ्यावी यासाठी पत्र दिले. पत्र वाचल्यावर माउंटबॅटन म्हणाले की तुम्ही आता स्वतंत्र आहात आणि तुमच्या हातात सत्ता आहे तसेच मी येथे थोडेच दिवस आहे तेव्हा तुम्हीच परिस्थिती नियंत्रित करा. त्यावर नेहरूजी म्हणाले की आम्ही परिस्थितीवर नियंत्रण करू शकत नाही म्हणून तुमच्याकडे आलो आहोत. माउंटबॅटन यांनी विचारले की, तुम्ही का नाही नियंत्रित करू शकत? तेव्हा नेहरूजी म्हणाले की, अशा परिस्थितीला हाताळायचा अनुभव आम्हाला नाही. तुम्ही दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपानविरूद्ध सर्व देशांच्या सेनेचे नेतृत्व केले. म्हणून तुम्हाला अनुभव आहे. तेव्हा माउंटबॅटन उत्तरले की तुम्ही इतका काळ राजनितीमध्ये सक्रिय आहात तर तुम्हाला अवश्य त्याचे ज्ञान असेल. त्यावर नेहरूजी म्हणाले की आम्ही सत्याग्रहाद्वारे भारताला स्वतंत्र करण्यात व्यस्त राहिलो. आम्हाला राज्यव्यवस्था चालविण्याचा अनुभव नसल्या कारणाने सत्तेची सूत्र आपण सांभाळून परिस्थितीवर नियंत्रण आणावे. मग माउंटबॅटन यांनी सत्तेची सूत्र आपल्या हाती घेऊन खूप कमी वेळात दंगे समाप्त केले.

हीच गोष्ट आपल्यालाही लागू होते. सत्ययुगात सुरुवात झाल्यानंतर माझ्यासारख्या अनुभव नसणाऱ्याला परमात्म्याने जर राज्य चालविण्यासाठी सांगितले तर माझ्यासारखा असेच उत्तर देईल की, बाबा, मला तर याचा काही अनुभव नाही. बाबा म्हणतील की, मुला तू तर ज्ञान, योग, धारणा, सेवा सर्व आत्मसात केले आहेस. यावर माझे उत्तर असे राहिल की, बाबा, मला जी शक्ती मिळाली ती मायेशी युद्ध करण्यात आणि स्वतःला परिवर्तन करण्यातच गेली त्यामुळे राज्यव्यवस्थेचा मला अनुभव नाही.

येथे मला जानकी दादींविषयी एक गोष्ट आठवते. जेव्हा ब्रह्माबाबा दादींना मधुबनमधून बाहेर ईश्वरी सेवेला पाठवू इच्छित होते तेव्हा दादींनी म्हटले होते की बाबा, मी तर तुमच्याजवळच राहणार. तेव्हा ब्रह्माबाबा म्हणाले की

मग मी दुसरी जानकी दादी कुठून आणू. अशाप्रकारे मी जर बाबांना म्हटले की बाबा, मी विश्वाचे राज्य सांभाळू शकत नाही तर शिवबाबा म्हणतील की तुम्ही जर सांभाळू शकणार नसाल तर मग तुमच्यासारखी दुसरी मुलं मी कुठून आणू? अशाप्रकारे विश्व राज्यव्यवस्थेच्या कारभारात आपण असफल होता कामा नये. शिवबाबा जर आपल्याला राज्य कारभार देऊ इच्छित असतील तर आपण मोठ्या हिमतीने कार्यभार उचलण्यासाठी पुढे आले पाहिजे. त्यासाठी आवश्यक व्यवस्थापन कला आणि अनुभव पुढे वाढवित नेणे गरजेचे आहे.

व्यवस्थापन शक्तीच्या अनुभवाच्या आधारावरच ब्रह्माबाबांनी दादी प्रकाशमणी, दीदी मनमोहिनी, दादी जानकी इत्यादींना निमित्त बनविले आणि मग त्यांनी यज्ञाचे सुव्यवस्थित संचालन केले. यासाठी व्यवस्थापन शक्तीचा अनुभव होणे गरजेचच आहे. शास्त्रांमधून दोन प्रकारच्या ऋषींचे वर्णन आहे - ब्रह्मऋषी आणि राजऋषी! जे स्वतः तपस्या करतात आणि लोककल्याणाबद्दल प्रबोधन करतात, त्यांना ब्रह्मऋषी म्हटले गेले आहे तर राज्य कारभार करणाऱ्या ऋषींना राजऋषी. अशाप्रकारे कार्य-भिन्नता आणि जबाबदारीच्या फरकामुळे आपल्यातील अनेक आत्मे ब्रह्मऋषी तर अनेक राजऋषी बनू शकतात. राजऋषी बनणाऱ्यांसाठी राज्यकारभार सांभाळण्याच्या व्यवस्थेचे ज्ञान असणे आवश्यक आहे आणि या संदर्भात एक शास्त्रामध्ये गोष्ट आहे की जेव्हा कुणी राजा अश्वमेध यज्ञ करीत असे आणि चारही दिशांना आपल्या विजयाचा झेंडा फडकवून परत आल्यावर यज्ञ समाप्तीनंतर त्याच्या मुखातून निघत असे 'अदण्डो अहम्' अर्थात माझ्यावर कुणीही नाही, मी सर्वांपेक्षा उच्च आहे, मला कुणी दंड करू शकत नाही! त्यावेळी राजाचे असलेले ब्रह्मऋषी गुरु उभे राहून त्रिवार म्हणत असत की 'धर्मेन दण्डो' अर्थात धर्म तुला दंड देऊ शकतो.

शास्त्रात असेही वर्णन आहे की गुरु वशिष्ठ आणि गुरु विश्वामित्र यांच्यामध्ये राजऋषी आणि ब्रह्मऋषी या मुद्द्यावर विवाद होता. एका रात्री गुरु विश्वामित्र गुरु वशिष्ठ यांचा वध करण्यासाठी तलवार घेऊन त्यांच्या आश्रमात गेले. कुटीमधून गुरु वशिष्ठ आणि माता अरुंधती-मधील होणारा संवाद त्यांच्या कानी पडला. गुरु वशिष्ठ अरुंधतीला म्हणाले की गुरु विश्वामित्र स्वभावाने खूप क्रोधी आहेत पण त्यांनी जर आपल्या स्वभावाला जिंकले तर मी त्यांना ब्रह्मऋषी म्हणेन. बाकी अन्य सर्व गोष्टींमध्ये ते परिपूर्ण आहेत.

हे ऐकून विश्वामित्र कुटीमध्ये जाऊन तलवार बाजूला टाकून वशिष्ठांच्या पायांवर पडले अन् म्हणाले, 'मला क्षमा करा'. तेव्हा वशिष्ठांच्या मुखातून निघाले, 'उठा ब्रह्मऋषी! तुमचे स्थान माझ्या पायाशी नाही तर माझ्या हृदयात आहे.' अशाप्रकारचे ब्रह्मऋषी आणि राजऋषी मधील अनेक प्रसंग शास्त्रामध्ये वर्णित आहेत. आपल्यालाही आपले भविष्य निश्चित करायचे आहे की आम्हाला राजऋषी बनायचे की ब्रह्मऋषी!

महाभारतात वर्णन आहे की भीष्माला सांगितले गेले की धृतराष्ट्राची विचारधारा चुकीची आहे. त्यावर भीष्म म्हणाले की राजा ईश्वराचे रूप आहे म्हणून राजाचा आदेश म्हणजे ईश्वराचा आदेश असे मी मानतो. अशाप्रकारे राजाला ईश्वराचे स्वरूप समजून भीष्म पितामह यांनी संपूर्ण जीवन कौरवांच्या पक्षात राहून कार्य केले आणि श्रीकृष्णाचा ही पूर्ण सन्मान केला. परंतु राजाप्रती असलेल्या निष्ठेपायी शेवटपर्यंत ते कौरवांबरोबर म्हणजे राजाच्या बाजूने राहिले. अशाप्रकारची त्या काळात लोकांची धारणा होती.

शास्त्रांमधील गोष्टींच्या खोलात गेल्यावर तेव्हा होत असलेल्या राज्यकारभाराच्या संदर्भातील अनेक गोष्टी हाती लागतील आणि ब्राह्मणांद्वारे समाज व्यवस्था कशी केली जाई हेही लक्षात येईल.

शिवबाबांनी देखील सत्ययुगी दुनियेतील वर्ग व्यवस्थेबाबत थोडेफार सांगितले आहे; जसे कलियुगात लोक तमोप्रधान, द्वापरमध्ये रजोप्रधान, त्रेतायुगामध्ये सतो आणि सत्ययुगात सतोप्रधान असतात. पूर्वीच्या काळी राजाला तीन-चार राजकुमार असल्यास त्यापैकी युवराज म्हणून निवडण्यासाठी त्या सर्वांची परीक्षा घेतली जात असे. अशाप्रकारे शिवबाबा सुद्धा अंतिम काळामध्ये मुलांची परीक्षा घेतील. शिवबाबांनी मुरलीत सांगितले आहे की, अंतिम समयी फक्त एक सेकंदाची

परीक्षा असेल आणि त्यामध्ये उत्तीर्ण होणारे राजतिलकधारी बनतील अर्थात सत्ययुगी राज्यकारभार सांभाळतील. अनुत्तीर्ण होणारे जे चिंदीधारी असतील ते त्रेतायुगी राज्यकारभार सांभाळतील. तात्पर्य म्हणजे अंतिम परीक्षेमध्ये पास होण्यासाठी खूप काळ अभ्यासाची आवश्यकता आहे.

सत्ययुगी दुनियेतील राजाला आपल्या प्रजेचा सांभाळ करावा लागणार आहे. हे तेच करू शकतील ज्यांना ज्ञान, योग, धारणा व सेवा या विषयांसह कार्यव्यवहार करण्याचा दीर्घकाळाचा अभ्यास असेल आणि तेच एका सेकंदाची परीक्षा पास करू शकतील. प्रजेच्या कल्याणासाठी अनेक प्रकारची कार्ये करावी लागतील. **ईश्वरी ज्ञानानुसार संगमयुगावरच आपण ब्राह्मण बनतो. ब्राह्मण हेच देवदूत आणि देवदूत हेच देवता बनणार. ज्याप्रकारे मनुष्य म्हणजे मनुची संतान म्हटली जाते त्याप्रमाणे ब्राह्मण म्हणजे ब्रह्माची संतान आहे. म्हणूनच बाबा आम्हा मुलांना ब्राह्मण म्हणतात** आणि ही वर्ग व्यवस्था सध्याच्या दुनियेतही चालू आहे. सध्याच्या काळातही ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र इत्यादी वर्ग आहेत. अगदी लौकिक दुनियेतही ब्राह्मणांची अनेक वर्गवारी आहे-

१) ऋषी ब्राह्मण - जे हिंदू धर्मात सर्वोच्च शिखरावर आहेत

२) राजा ब्राह्मण - जसे की कण्व वंश हा ब्राह्मण वंश होता कारण त्याचे आदि स्थापक कण्व ऋषी होते आणि या वंशाच्या राजांनी त्या काळच्या पाटलीपुत्र राज्यात राज्य केले. महाराष्ट्रातही पेशवे यांनी राज्य केले तेही ब्राह्मण पेशवे होते.

३) आचार्य ब्राह्मण - ज्यामध्ये शंकराचार्य, माधवाचार्य इत्यादी आचार्य ब्राह्मण होऊन गेले व अशा आचार्य ब्राह्मणांनी जैन धर्मासाठी दर्शनशास्त्र (तत्वज्ञान) लिहिले आहे. एक गंमतीदार गोष्ट मी लिहितो की, नास्तिक विचारधारा असलेले आचार्य चार्वाक सुद्धा आचार्य ब्राह्मण होते.

४) पंडित ब्राह्मण - वाचस्पति मिश्र किंवा मंडनमिश्र सारखे हजारोंच्या संख्येत पंडित ब्राह्मण झालेले आहेत.

५) मंत्री ब्राह्मण - अशाप्रकारचे ब्राह्मण राजाच्या दरबारी दिवाण किंवा प्रधानमंत्रीच्या रूपाने काम करीत असत. जसे चंद्रगुप्त मौर्यच्या काळी आचार्य चाणक्य होऊन गेले त्यांनी स्वकष्टाने चंद्रगुप्तला राजा बनविले आणि राजनितीवर विविध पुस्तके लिहिली.

६) साहित्यकार ब्राह्मण - यात अनेक प्रकारचे ऋषी होऊन गेले, ज्यांच्यात वाल्मिकी, कालिदास, इत्यादींचा समावेश होतो. त्यांनी उत्कृष्ट साहित्याची रचना केली आहे.

७) कबर खोदणारे ब्राह्मण - या प्रकारचा ब्राह्मण संप्रदाय अनेक ठिकाणी आहे. विशेषकरून मुस्लिम राजांच्या काळात त्यांची वृद्धी झाली. जेथे जेथे मुस्लिम राजांनी युद्ध केली तेथे त्यांच्या मुस्लिम सहकाऱ्यांना कबरीत दफन करण्यासाठी अशा ब्राह्मणांना सोबत नेले जाई.

८) नोकरी करणारे ब्राह्मण - असे ब्राह्मण राजांजवळ नोकरी करीत असत. राज्यकारभाराच्या विभागांचे प्रमुख म्हणून त्यांना आपल्या दरबारी राजा त्यांची नेमणूक करीत.

९) शेतकरी ब्राह्मण - हे शेती करणारे ब्राह्मण असून शास्त्रांमध्ये त्याचे वर्णन आहे. ते उपजिवीकेसाठी धान्य पिकवीत असत. शेतीच्या माध्यमातून अनेक प्रकारची कार्ये होत असत. यासंदर्भात सीतेच्या जन्माची कहाणी खूप प्रसिद्ध आहे. जमीन नांगरणी करताना जनक राजाला सीता प्राप्त झाली आणि शेवटी धरणीमध्येच सीता सामावली गेली.

१०) भिक्षुक ब्राह्मण - असे भिक्षुक ब्राह्मण दक्षिणा घेऊन कितीतरी प्रकारचे कार्य करीत असत. उदाहरणार्थ, लग्न लावणे, श्राद्ध विधी करणे किंवा कथा-कथन करणारे इ.

११) न्यायाधिकारी ब्राह्मण - हे ब्राह्मण न्यायाधिकारी बनून कारभार करीत असत. उदाहरणार्थ, पेशवे कालीन रामशास्त्री न्यायमूर्ती म्हणून प्रसिद्ध होते. राज्यकारभारात आणि युद्धात पूर्वी राजा व्यग्र असे म्हणून न्यायदानाचे कार्य न्यायाधिश ब्राह्मण करीत.

अशाप्रकारे वर्तमानसमयी अकरा प्रकारचे ब्राह्मण आहेत. परंतु यामध्ये आपल्या दैवी ब्राह्मणांच्या नवीन पंथाचाही समावेश केला पाहिजे. दैवी ब्राह्मण अर्थात प्रजापिता ब्रह्माची मुखवंशावली म्हणजेच परमात्म्याने ब्रह्मामुखाद्वारे ज्यांना जन्म दिला. असे दैवी कुळातील ब्राह्मण फक्त संगमयुगातच असतात.

ब्राह्मण या शब्दाच्या विस्तारात अशासाठी जावे लागले

▶ पान क्र. १२ वर

ईश्वरी सेवा हाच खरा परीस

ब्र.कु.गोदावरी, मुलुंड (मुंबई).

ईश्वरी परिवारातील प्रत्येकामध्ये कुठली ना कुठली विशेषता जरूर आहे. ती विशेषता ओळखून तिला कर्मात आणा. जोही गुण अथवा विशेषता असो, एखादी कर्मणाचा गुण आहे. समजा मधुरतेचा गुण आहे, स्नेहाचा आहे त्याला कार्यात आणा. **जसे लोखंडाला परीसाचा स्पर्श होताच, त्याचाही परीस बनतो. तसेच एक-एक गुण वा विशेषता ईश्वरी सेवेत लावल्याने, सेवेचे फळ एकाचे लाख पटीने प्राप्त होते.** फलस्वरूप एक विशेषता अनेक वेळेला फळ देण्यासाठी लायक बनते. जसे एका बीजापासून कितीतरी फळे प्राप्त होतात तशी एक विशेषता कर्मात आणणे अर्थात बीज धरणीत टाकणे होय. यावरून लक्षात येईल की आपण किती खुशनशीब आहोत. ब्राह्मण परिवारात जन्म झाला आहे म्हणजे जन्माबरोबरच कुठली ना कुठली विशेषता भाग्य रूपाने जरूर प्राप्त आहे. फक्त फरक तेथे पडतो की आपण प्रत्येक जण ती विशेषता कार्यात किती लावतो? त्यामुळे विशेषतारूपी बीज ईश्वरी कार्यात वा सेवेत लावता आले पाहिजे.

❒ अनेकतेमध्ये एकता कशी येईल?

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे ड्रामाअनुसार आपल्याला जी विशेषता प्राप्त आहे ती सदैव कार्यात लावल्याने, दुसऱ्यांची देखील विशेषता दिसते. परंतु होते काय, आपण दुसऱ्यांची विशेषता न पाहता, अन्य गोष्टी बघतो त्यामुळे हार होते. म्हणूनच प्रत्येकाची विशेषता स्मृतीत ठेवा तसेच एक दुसऱ्यावर विश्वास ठेवा म्हणजे अन्य ज्या गोष्टी आहेत त्याविषयीचा भाव बदलून जाईल. **जसे आपल्या मित्राविषयी तिसऱ्याने येऊन ग्लानी केली तर आपण त्याला आपल्या मित्राविषयी दोन चांगल्या गोष्टी सांगतो आणि त्याच्या मनातील भाव बदलून टाकतो. अशाप्रकारे प्रत्येकाची विशेषता पाहा म्हणजे अनेक असूनही एक दिसून येतील. एक मत संघटन दिसेल.**

कोणी कितीही ग्लानीच्या गोष्टी सांगितल्या तरी त्याला टेका देऊ नका तर ग्लानी करणाऱ्याचे रूप परिवर्तन करा. त्याच्या भावनेत परिवर्तन करा. हा अभ्यास फार महत्वाचा आहे. नाही तर प्रत्यक्षात काय होते दुसऱ्याकडून एखादी गोष्ट ऐकली की ती आपण तिसऱ्याला सांगतो, तो चौथ्याला सांगतो. परिणामतः व्यर्थ गोष्टी वातावरणात पसरतात. त्यामुळे वातावरण शक्तिशाली होत नाही तसेच स्वतः साक्षात्कार मूर्त बनू शकत नाही.

म्हणूनच सदैव सर्वांविषयी मनात शुभभावना आणि कल्याणाची भावना ठेवा. एक दुसऱ्याची ग्लानी करणाऱ्या गोष्टी ऐकणे म्हणजे समय व श्वास व्यर्थ गमावणे आहे. कमाईपासून वंचित होणे आहे. जर दुसऱ्यांच्या गोष्टींचे परिवर्तन करू शकत असलात तर त्या ऐका अन्यथा ऐकत असूनही ऐकू नका. **प्रत्येकाची विशेषता तेवढी वर्णन करा कोणी जरी असे म्हटले की मी प्रत्यक्ष डोळ्याने पाहिले तरी आपल्या तोंडातून कुठलाही अपशब्द काढू नका. आपण मात्र त्या आत्म्याची विशेषता वर्णन करून, त्या गोष्टीचे परिवर्तन करा. तात्पर्य म्हणजे सर्वांच्या मुखातून प्रत्येका-विषयी वाहवा निघाली पाहिजे तेव्हाच शिवबाबांची सर्वत्र वाहवा होईल.** कुठेही एखादी उलट-सुलट गोष्ट दिसून आली किंवा आपल्या कानावर आली तरी ती मनात ठेऊ नका. वरिष्ठांना अथवा शिवबाबांना सांगा आणि विसरून जा. आपले मन सदैव खाली व हलके ठेवा. जर आपल्या मनात कुठल्याही प्रकारची एखादी गोष्ट असेल तर तेथे शिवबाबा नसतील.

कोणाचेही अवगुण एक दुसऱ्याच्या समोर वर्णन करता कामा नये कारण अवगुण वर्णन करणे अर्थात रोगजंतूचा प्रसार करण्यासारखे आहे. जसे रोगजंतू हे पॉवरफुल औषधाने लगेचच मारून टाकले जातात तसे आपणही त्या व्यक्तीच्या गुण वा विशेषतांचे वर्णन केले पाहिजे. आपल्या अंतःकरणा-तून हे उद्‌गार निघाले पाहिजेत की ती व्यक्ती खूप चांगली आहे. आपल्या संबंध-संपर्कात अनेक व्यक्ती अनेक प्रकारचे भाव मनात ठेऊन येतील परंतु आपल्याकडून मात्र प्रत्येकाला शुभभावनाच मिळाली पाहिजे. अशाप्रकारे सर्वप्रकारच्या

व्यर्थ गोष्टींचा स्टॉक समाप्त करून सदा सर्वांविषयी शुभ-भावना व शुभकामना बाळगल्याने सदा निर्विघ्न व खुशीच्या हिंदोळ्यात सदैव झोके घेणारे खुशनशीब आत्मे असल्याचा अनुभव सर्वांना होईल.

आपल्या प्रत्येक बोलमध्ये आत्मियता असली पाहिजे. फलस्वरूप आपला प्रत्येक शब्द अतिशय मधुर असेल. आता समयानुसार आपली सर्वांची स्थिती अतिशय उच्च बापसमान संपन्न व संपूर्ण बनली पाहिजे. ❖❖❖

▶ पान क्र. १० वरून

कारण आपल्या यज्ञातही अशाप्रकारचे विभाजन झाले आहे. यज्ञाची स्थापना झाल्यावर १९६९ पर्यंत राज्य-कारभार म्हणजे विश्वविद्यालयाचे संचालन आणि परमात्म अवतरणद्वारा ईश्वरीय ज्ञान देण्याचा कारभार एक ब्रह्माबाबा यांच्याच हाती होता. त्यानंतर जबाबदारीचे विभाजन झाले आणि दादी प्रकाशमणी, दीदी मनमोहिनी इत्यादी यज्ञ व्यवस्थेचा कारभार पाहू लागल्या आणि दादी गुलजारच्या माध्यमातून परमात्म्याचे दिव्य अवतरण आणि ज्ञान देण्याचे कार्य होऊ लागले. सृष्टीरूपी रंगमंचावरही सुरवातीला ब्रह्मऋषी आणि राजऋषी दोघांचे स्वरूप एकच असेल. जसे विष्णु हे लक्ष्मी-नारायणाचे एकत्रित रूप यादगार म्हणून आपल्यासमोर आहे. **अशाप्रकारे सत्ययुगात राजऋषी तथा ब्रह्मऋषी दोघांचे कार्य एकाच द्वारे होईल आणि नंतर कार्याच्या आधारावर विभाजन झाले असेल. ज्ञान देण्याचे कार्य ब्रह्मऋषींनी आणि राज्यकारभार करण्याचे कार्य राजऋषी म्हणजे महाराजांनी केले असेल.** गौतमबुद्ध, महावीर, मोजेस् हे राजपरिवारातील होते. राजपरिवारात जन्माला येऊनच ते राजऋषीपासून ब्रह्मऋषी बनले. याच विषयावर पुढील लेखात चर्चा करूया. *(क्रमशः)*

(भावानुवाद : ब्र. कु. जयश्रीबहेन, विक्रोळी-मुंबई).

ईश्वरी ज्ञान, गुण आणि शक्तींचे कवच धारण करून सदा सुरक्षित राहणाऱ्या, सर्व बंधु-भगिनींना रक्षाबंधन व जन्माष्टमीच्या कोटी-कोटी मंगलकामना !

- ब्र. कु. गोदावरी बहेन, मुलुंड.

खऱ्या व खोट्या हिऱ्याची पारख

रत्नपारखी नावाचा एक राजा होता. तो अत्यंत चांगल्या रीतीने राज्यकारभार करीत होता. एकदा त्याने आपल्या राज्यातील नगरवासियांना एकत्र बोलावले व त्यांच्यासमोर दोन हिरे ठेवले. त्यातील एक हिरा खरा होता व दुसरा खोटा होता. राजाने सर्वांना उद्देशून सांगितले की यातील खरा व खोटा हिरा कोणता याची पारख जो करेल त्याला इनाम दिले जाईल. त्यानुसार अनेकांनी त्या हिऱ्यांची पारख करण्याचा प्रयत्न केला. कित्येक सोनार देखील आले परंतु तेही पारखू शकले नाहीत. कारण दोन्ही हिऱ्यांचे वजन सारखे होते, आकारमान सारखे होते, रंगही सारखा होता. त्यामुळे त्यांची पारख करणे अतिशय अवघड होते.

सर्वांनी आपल्या परखशक्तीच्या आधारे ओळखण्याचा प्रयत्न केला. शेवटी एक सूरदास आला व तो राजाला म्हणाला की मी ओळखू शकेन पण माझी एक अट आहे. राजाने त्याची अट विचारली तेव्हा तो सूरदास विनयपूर्वक म्हणाला की मला ते हिरे घेऊन बाहेर जावे लागेल. राजाने त्याची ही अट मान्य केली. त्यानंतर तो सूरदास हिरे घेऊन राजमहालाच्या बाहेर गेला. दहा मिनिटानंतर त्याने राजाला येऊन सांगितले की हा हिरा खरा आहे आणि हा खोटा आहे.

राजाला अतिशय आश्चर्य वाटले. तेव्हा त्याने सूरदासला विचारले की तू हे कसे काय ओळखलेस ? त्यावर सूरदास म्हणाला की मी या दोन्ही हिऱ्यांना उन्हात ठेवले. यातील जो हिरा खोटा होता तो थोड्या वेळातच गरम झाला. या छोट्याशा गोष्टीवरून आपल्या हे लक्षात आले असेल की **जेव्हा एखादी गोष्ट, एखादे कारण वा परिस्थितीरूपी ऊन आपल्यावर पडते तेव्हा जर आपण गरम झालो नाही तर समजावे आपली स्थिती खऱ्या हिऱ्यासारखी आहे. वरील कथेत वर्णित सूरदासाप्रमाणे अगदी अज्ञानी मनुष्यसुद्धा ही गोष्ट ओळखू शकतो. तात्पर्य म्हणजे 'ॐ शांती' चे ज्ञान देणाऱ्याने कधीही अशांत (गरम) होता कामा नये तरच तो खरा ज्ञानी होय.** ❖❖❖

ब्रह्मावत्सांकरिता...

सोळा हजार एकशे आठच्या माळेचेही असाधारण महत्व

ब्र.कु.जगदीश दिक्षीत, पुणे.

पुरुषोत्तम संगमयुगावर पिताश्री ब्रह्माबाबा, मातेश्वरी सरस्वती तसेच सर्व ब्रह्मावत्सांसाठी शिवबाबांनी एकमात्र लक्ष्य दिले आहे श्री लक्ष्मी-नारायण बनण्याचे. ज्ञानी तू आत्मे जाणतात की सर्वच ब्रह्मावत्स नंबर १ श्री लक्ष्मी-नारायण बनू शकत नाहीत. त्याचबरोबर ते हे देखील जाणतात की, अष्टरत्नांच्या माळेत केवळ आठ तर वैजयंती माळेत एकशे आठच महारथी आत्मे स्थान प्राप्त करू शकतात. **ज्याप्रमाणे वर्षभर अभ्यास करून परीक्षा दिल्या-नंतर हुशार विद्यार्थ्याला अंदाज येतो की आपण किती मार्कांनी पास होणार आहोत. तद्वतच आतापर्यंत झालेला पुरुषार्थ व भविष्यात होणारा पुरुषार्थ याच्या आधारे मज आत्म्याचे स्थान मणीच्या रूपात कोणत्या माळेत असेल व सत्ययुगात कोणते पद प्राप्त होईल याचा अंदाज प्रत्येक ब्रह्मावत्साने घ्यावा.** माळेतील स्थान हे पुरुषार्थाशी निगडीत असल्याने जो वास्तविक पुरुषार्थ आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सत्ययुगाच्या आदिमध्येच देवी-देवतांची संख्या नऊ लाख असते. त्या नऊ लाखात एकशे आठ देवात्मे अग्रेसर असतील. त्या एकशे आठमध्ये मज आत्म्याचे स्थान असू शकेल काय? याचे विवेकयुक्त चिंतन प्रत्येक पुरुषार्थी आत्म्याने अवश्य करावे. चिंतनोत्तर कित्येकांच्या आंतर्आत्म्यातून आवाज येईल की, मज आत्म्याने आतापर्यंत इतका महान पुरुषार्थ केलेला नाही व भविष्यात होण्याची शक्यता नाही. माझ्या आत्मबलाची क्षमता मी जाणलेली आहे. मज आत्म्याला केवळ नारायणी नशा असून उपयोग नाही तर त्याप्रमाणे पुरुषार्थ करणेही आवश्यक आहे. एव्हरेस्ट शिखर जोपर्यंत कोणीच गाठले नव्हते तोपर्यंत हजारो गिर्यारोहकांनी ते गाठण्याचा संकल्प केला होता. परंतु शिखर प्रथमतः सर केले ते शेरपा तेनसिंग व हिलरीने. प्रत्येक साधकाने नंबर १ चे लक्ष्य अवश्य ठेवावे परंतु त्याचबरोबर आपल्या वास्तविक पुरुषार्थाचे भानही ठेवावे. सोळा हजार एकशे आठची माळा संख्येच्या दृष्टीने मोठी असल्याने तीव्र गतीचा पुरुषार्थ करून त्या माळेचा मणी बनणे हे फार अशक्य नाही. **सोळा हजार एकशे आठची माळा ही अत्यंत निवडक अशा अनन्य आत्म्यांची माळा आहे कारण ही संख्या नऊ लाखाच्या दोन टक्केही नाही. फलस्वरूप या माळेत येणे हा काही साधारण पुरुषार्थ असू शकत नाही.** त्यासाठी अत्यंत गुणवत्तापूर्ण महान पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे. म्हणून या माळेचे लक्ष्य ठेवणाऱ्या साधकांनी त्या लक्ष्यानुसार आपल्या पुरुषार्थाची गती अधिक तीव्र करावी.

साधकांनी कितीही पुरुषार्थ केला तरी त्रिकालाबाधीत सत्य हेच आहे की, अष्टरत्नांची एकच, एकशे आठची एकच व सोळा हजार एकशे आठचीही एकच माळ बनणार आहे. ज्याप्रमाणे शारीरिक बलानुसार वजन उचलले जाते तद्वतच आत्मबलाच्या आधारे ज्या गुणवत्तेचा पुरुषार्थ केला जातो त्यानुसारच पुरुषार्थी आत्मे भिन्न-भिन्न माळेत तसेच सत्ययुगातही आपले स्थान प्राप्त करतात. ज्ञानी त्यालाच म्हणावयाचे जो आपल्या वास्तविक पुरुषार्थाचा यथायोग्य विचार करून आपण कोणत्या माळेच्या लायक आहोत हे यथार्थतः जाणतो. दरवर्षी लाखो विद्यार्थी एस्.एस्.सीची परीक्षा देत असतात. परंतु गुणवत्ता यादीनुसार केवळ पहिल्या शंभर विद्यार्थ्यांची नांवे वृत्तपत्रात छापून येतात. काही हुशार विद्यार्थी पहिल्या शंभरात येत नाहीत परंतु त्यांना ९०% पेक्षाही अधिक मार्क्स मिळालेले असतात. असे मार्क्स मिळविणे हे देखील कौतुकास्पद असते. तद्वतच एकशे आठच्या माळेचा मणी बनण्याऐवजी सोळा हजार १०८चा मणी बनणे हे देखील फार मोठी बाजी मारण्यासारखे आहे. ही माळा एकशे आठच्या माळेइतकी उच्च नसली तरी उच्च मात्र निश्चितच आहे. पहिल्या तीन माळेविषयी महत्वपूर्ण ज्ञान हेच आहे की, अष्ट रत्नांच्या माळेतील मणी एकशे आठच्या माळेतही असतात तर एकशे आठच्या माळेतील मणी सोळा हजार एकशे आठमध्येही असतात. बहुदा अष्टरत्न सर्वांनाच बरोबर घेऊन पुढे जात असल्याने ह्या प्रत्येक माळेत त्यांचे स्थान असावे.

सोळा हजार एकशे आठच्या माळेत येण्यासाठी ज्ञान, योग, धारणा, सेवा या चारही विषयात पास विथ ऑनरची पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी परमात्म ज्ञानाची गुह्यता जाणून त्याचा सखोल अभ्यास होण्यासाठी विचार सागरमंथन करावे. या मंथनातूनच ज्ञानाचे नवनीत म्हणजेच नवनिर्माण होऊ शकते. मनसा सेवेबरोबर वाचा सेवाही व्हायला हवी. वाचा सेवा ही ज्ञानाच्या धारणेला मदत करते. ज्ञान, धारणा आणि सेवा यात कितीही मार्क्स प्राप्त झाले तरी योग हा महत्वाचा विषय आहे. जर साधकास स्वर्गीय विश्वाचे राज्याधिकारी व्हायचे असेल तर विश्वातील प्राणीमात्रासहित सर्व मनुष्यआत्मे व पाच तत्वांना योगदान करणे आवश्यक आहे. तुम्हाला येथील अणू-रेणू पावन करावयाचा असेल तर केवळ देशातील ठराविक विभागासाठी अथवा आपल्या देशासाठी योगदान न करता संपूर्ण विश्वासाठी योगदान करावे. या माळेत येणारे साधक हे कधीही विसरत नाहीत की मज आत्म्याला स्वकल्याण व विश्वकल्याणार्थ योगदान करावयाचे आहे. योगसाधना करताना शक्यतो कोणत्याही गीतांचा किंवा कॉमेंट्रीचा आधार घेऊ नये. योग म्हणजे व्यक्तापासून अव्यक्त होऊन आवाजाच्या पलिकडे जाणे होय. योगाच्या कॉमेंट्रीची आवश्यकता केवळ नवीन जिज्ञासूंना योग कसा साधावा हे कळण्यासाठी आहे. कॉमेंट्रीचा व गीतांचा वर्षानुवर्षे आधार घेणे म्हणजे वास्तविक योगापासून दूर राहणे होय!

योग म्हणजे आत्मा परमात्म्यावरील चिंतन, योग म्हणजे परमात्म्याशी संकल्पांद्वारे केलेले रुहरिहान, योग म्हणजे परमात्म्याशी सर्व संबंध जोडणे होय! योग अर्थात देहभान पूर्णतः विसरून परमधाममध्ये आपल्या ज्योतिर्बिंदू अनादि स्वरूपात प्रवेश करणे. योग अर्थात आत्मानुभूती आणि परमात्मानुभूती साध्य करणे. योग अर्थात निराकार परमात्म्याकडून निराकार आत्म्याने प्रकाश, शक्ती व शांतीची अद्‌भूत किरणे प्राप्त करणे होय. परमधाममध्ये अशी किरणे प्राप्त केल्याने जन्मजन्मांतरीची विकर्मे व कर्मबंधने नष्ट होऊन, अल्पावधीतच आत्मा शक्तिशाली व पावन होतो. ही साधना प्रतीदिन करता-करताच साधक जीवनमुक्त व कर्मातीत अवस्थेकडे अग्रेसर होतो. प्रत्येक राजयोग्याने हे आपल्या बुद्धीत ठेवावे की, कर्मयोगात थोड्याफार प्रमाणात विकर्मे विनाश होतात. आकारी (फरिश्ता रूपात) योगात त्यापेक्षा अधिक विकर्मे विनाश होतात तर निराकारी योगसाधनेत सर्वाधिक अर्थात जन्मजन्मांतरीची विकर्मे विनाश होतात. काही वेळा असे सांगितले जाते की, स्वतःला आत्मा समजून परमधाममध्ये जाऊन परमात्म्याला याद करावे परंतु परमधाम हे काही परमात्म्याला याद करण्याचे स्थान नव्हे. तेथे तर आत्मा व परमात्माच्या मंगलमिलनाचा अनुभव करावयाचा असतो. आई व मुलगी दूर अंतरावर असतील तर त्या एकमेकींची आठवण काढू शकतात परंतु त्या एकमेकींसमोर आल्यानंतर मात्र भेटीचा अर्थात मिलनाचाच अनुभव करतात. तद्वतच परमधाममध्ये केवळ आत्मा व परमात्माच्या मिलनाचाच अनुभव करावयाचा आहे. सोळा हजार एकशे आठच्या माळेत स्थान प्राप्त करणाऱ्या आत्म्यांनी श्रीमतानुसार राजयोगाची यथार्थ विधी जाणून सिद्धी प्राप्त करावी. **ज्ञान, योग, धारणा, सेवा या चार विषयात जो काही पुरुषार्थ केला जाईल त्याची गोळाबेरीज होऊनच तुम्हाला तुमचे माळेतील व दैवी युगातील पद प्राप्त होणार आहे.** ज्या आत्म्यात जी विशेषता असते त्या विशेषतेच्या आधारे त्याचा विशेष पुरुषार्थ होत असतो. दिवंगत ज्येष्ठ भ्राता जगदीश भाईंनी ईश्वरीय साहित्यावर लिखाण करून विशेष पुरुषार्थ केला. आजही 'ज्ञानामृत' या हिंदी मासिकात 'संजय की कलमसे' या सदराखाली त्यांचे ज्ञानाची गुह्यता उकलणारे विशेष लेख येत असतात.

ज्ञानाची परिपक्वता नसेल तर जिज्ञासू आपल्या अनुमानाने स्वतःचे समाधान करून घेतात. कोणते आत्मे कोणत्या माळेचे अधिकारी बनतील. याविषयी काही जिज्ञासूंचे अनुमान असते की जे ब्रह्मावत्स स्टेजवर चांगल्या प्रकारे प्रवचन करतात, ज्यांचा स्टेजवर मानसन्मान केला जातो, ज्यांचा प्रत्येक कार्यक्रमात पुढाकार असतो, जे गीतापाठशाळेच्या निर्मितीसाठी निमित्त बनतात, जे धनाने सर्वाधिक सेवा करून मानमर्तबा प्राप्त करतात असे आत्मेच उच्च प्रतीच्या माळेत आपले स्थान प्राप्त करीत असावेत. **बंधूंनो, अशा या भिन्न-भिन्न पुरुषार्थाचे मार्क्स तर अवश्य जमा होतील व त्यानुसार त्यांचे दैवी प्रारब्धही बनेल परंतु**

उच्च प्रतीच्या माळेत स्थान प्राप्त करण्यासाठी इतका पुरुषार्थ पर्याप्त होऊ शकत नाही. त्यासाठी सर्वांगीण पुरुषार्थाची आवश्यकता आहे. तुम्ही स्वतःसाठी किती योगसाधना केलीत तसेच स्वतःची व्यर्थ संकल्पातून मुक्ती करून किती श्रेष्ठ व समर्थ संकल्प केलेत? विश्वातील सर्व आत्म्यांसाठी व पाच तत्वांसाठी किती योगदान केले? तुम्ही आपल्या कर्मेंद्रियांवर व मन बुद्धीवर नियंत्रण करून किती श्रेष्ठ कर्मे केलीत? आत्माभिमानी स्थिती प्राप्त करून आत्मिक दृष्टीचा अभ्यास किती केला? किती आत्म्यांना बापसमान बनविले? अशाप्रकारच्या सर्वांगीण पुरुषार्थावरच तुमची माळा व त्या माळेतील स्थान निश्चित होत असते. खरे तर शिवबाबांची ज्ञानमुरलीच भिन्न-भिन्न माळांची व दैवी समाज व्यवस्थेची रचना करीत असते. सोळा हजार एकशे आठच्या माळेत स्थान प्राप्त करू इच्छिणाऱ्या साधकांनी ज्ञानमुरलीतील धारणा अधिकाधिक पर्सेंटेजमध्ये करणे आवश्यक आहे. या धारणेला अत्यंत महत्व असल्याने मुरलीत खास त्यासाठी 'धारणा के लिए मुख्य सार' हे सदर असते.

सोळा हजार एकशे आठच्या मौल्यवान माळेत स्थान प्राप्त करू इच्छिणाऱ्या साधकाचे विचार, आचार, वृत्ती व वाणी श्रेष्ठ असावी. अशी श्रेष्ठता रोजची ज्ञानमुरली व राजयोगाने प्राप्त होऊ शकते. राजयोगी अथवा राजऋषी आत्म्याला कलियुगी व्यर्थ चर्चेत अंशमात्रही रस वाटता कामा नये. यामध्ये लौकिक संबंधियांच्या विषयी केलेली चर्चा, खाद्य पदार्थांची चर्चा, शारीरिक व्याधींची चर्चा व त्याचे सविस्तर वर्णन, भिन्न-भिन्न फॅशनविषयी चर्चा तसेच आर्थिक प्रगतीच्या आधारे कोणत्या व्यक्तीने किती वैभव व भौतिक सुख प्राप्त केले यावर प्रभावित होऊन केलेली रसभरीत चर्चा; या चर्चेत बहुतांश लोक प्रभावित होत असतील परंतु जे सत्ययुगी स्वर्गात देवतांचे कांचनमय पवित्र शरीर धारण करून रत्नजडित सुवर्ण महालात निवास करीत होते व अल्पकाळातच पुन्हा त्या सुवर्ण महालांचे निवासी होणार आहेत; ते कलियुगी नरकातील भ्रष्ट व्यक्ती व त्यांच्या वैभवावर कदापी प्रभावित होऊ शकत नाहीत. कलियुगाच्या अंतिम समयी राजकारणही अत्यंत भ्रष्ट झाले आहे. चार लोक एकत्र आले की सध्याच्या राजकारणावरही जोरदार चर्चा होत असते परंतु ज्ञानी तू आत्मा जाणतो की, सध्याची लोकसत्ता ही अशाश्वत व अल्पकाळाची आहे. याच मुख्य कारणही तो जाणतो की, कलियुगात सद्गुण, सत्यता व नितीमूल्यांचा ऱ्हास झाल्याने राजकारणात बरेच भ्रष्ट आत्मे आहेत. जितके भ्रष्ट राजकारण तितकेच ते अशाश्वत असते. येथे ना कोणत्या राजकीय पक्षाचा ना कोणत्या नेत्याचा भरवसा राहिला आहे. ज्या राजकारणात भ्रष्टाचाराची स्पर्धा लागली आहे अशा राजकारणात रस घेणे म्हणजे अप्रत्यक्षपणे भ्रष्टाचारालाच प्रोत्साहन देण्यासारखे आहे. तुम्हाला राजकारणातच रस घ्यावयाचा असेल तर तो परमात्म्याच्या शाश्वत राजकारणात रस घेऊन दैवी राजसत्ता प्राप्त करावी. **परमात्मा सर्वश्रेष्ठ असल्याने त्याचे राजकारणही सर्वश्रेष्ठ, सात्विक आणि विश्वातील सर्व आत्म्यांचे कल्याण साधणारे आहे. हे एकमेव असे राजकारण आहे की ज्यामुळे दुःख, अशांतीची परिसीमा होऊन गेलेल्या या विश्वात २५०० वर्षांकरितां शांती स्थापन केली जाते.** परमात्मा हे जाणतो की वर्तमान समयी सर्वत्र रावणाचे (पाच विकारांचे) साम्राज्य आहे. फलस्वरूप दुःख व अशांतीची परिसीमा झाली आहे. प्रत्येक नरनारीच्या मनाचा ताबा या रावणाने घेतला आहे. मानवी मनातील हे रावणराज्य नष्ट करण्यासाठी परमात्मा ज्ञान व योगाची शस्त्रे प्रदान करतो. या शस्त्रांच्या आधारे साधारण नरनारी या रावणावर विजय प्राप्त करून आपले जीवन सत्य परमात्म्याच्या मतानुसार श्रेष्ठ बनवितात. अशा श्रेष्ठ व सत्यवादी मनुष्यआत्म्यांनाच तो सत्ययुग त्रेतायुगाची संपूर्ण सुखदायी, विघ्नमुक्त, युद्धमुक्त आणि समस्यामुक्त अशी राजाई बहाल करतो. अशाप्रकारे सर्वात धुरंधर राजकारणी निराकार परमात्मा, रावणासारखी दुष्कृत्ये करणाऱ्या मानवाला नष्ट करीत नसून, दुष्कृत्ये करवून घेणाऱ्या मानवी मनातील सूक्ष्म रावणाचे निर्दालन करतो. या रावणाचे राज्य सर्वत्र असल्याने सध्याच्या राजकारणातही या रावणाचा सहभाग आहे. राजकारणातील कूटनितीच्या मूळाशी हा रावणच आहे. या रावणाच्या अधिपत्याखाली प्रजा भ्रष्ट झाल्याने निवडून येणारे नेतेही बहुदा भ्रष्ट असतात. जेथे रावणराज्य आहे तेथेच निवडणूका होत

असतात. रामराज्यात (सत्य-त्रेतायुगात) कधीही निवडणूका होत नाहीत परंतु तेथील महाराजा व महाराणी यांची निवड त्यांचे सात्विक व्यक्तिमत्व व शरीराभोवती असणाऱ्या प्रभामंडलाच्या आधारे केली जाते. तेथे राजसत्तेची कुणासही आसक्ती नसते.

'अंत मती सो गती' तसेच 'बहुत कालका अभ्यास अंतमे काम आयेगा' ही दोन महत्वपूर्ण घोषवाक्ये राजयोग्यांनी मनात कोरून ठेवायला हवीत. ज्याप्रमाणे १०८च्या वैजयंती माळेत स्थान प्राप्त करणाऱ्या महारथी आत्म्यांची नष्टोमोहः स्थिती अत्यंत मजबूत असणार आहे, तद्वतच सोळा हजार एकशे आठच्या माळेत स्थान प्राप्त करणाऱ्या आत्म्यांची स्थिती ही सदा व विशेषतः अंतिम समयी मजबूत रहाणे आवश्यक आहे. मोहाविषयी रामायणात विशेष उदाहरण आहे की, सीतेला सोनेरी हरिणाचा मोह झाला आणि त्या मोहापायीच सीतेबरोबरच श्रीरामालाही अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. ब्रह्मावत्स लौकिक मोहातून सहज मुक्त होतात परंतु अलौकिक मोहामध्ये मात्र नकळत बद्ध होतात. आम्हाला मुरली वाचनासाठी अमुक एक बहेनजीच हव्या आहेत अथवा विशेष मर्जी असलेला एखादा ब्रह्मावत्स क्लासमध्ये नसेल तर टीचरलाही त्याची आठवण येत राहते. या मोहाच्या सोनेरी जंजीर आहेत. 'मेरा तो एक शिवबाबा दुसरा न कोई' हा पाठ पक्का करून मोहाच्या या सुवर्ण शृंखला तोडाव्यात. त्यासाठी निमित्त टीचरची देखील सर्वांसाठी समान आत्मिक दृष्टी असावी. सर्वांच्या अलौकिक व कल्याणकारी इच्छा पूर्ण करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा. शक्यतो कुणाच्याही मनात नैराश्येचे अथवा उलहनेचे संकल्प येऊ न देता वेळोवेळी उमंग-उत्साह देऊन, ज्या आत्म्यात जी विशेषता आहे; त्याचा सेवेत उपयोग करून सर्वांना संतुष्ट ठेवणे हे तर निमित्त टीचरचे उच्चप्रतीचे कर्मकौशल्य आहे. हे कौशल्य त्याचवेळी साधले जाईल ज्यावेळी कुणातही व कशातही मोह राहणार नाही. अंतिम समयी हा मोहच सर्वांची अंतिम परीक्षा घेणार आहे. विचार करा महाविनाश होत असताना तुम्हाला तुमच्या निकटवर्तीय परिचयाचा मनुष्य आत्मा भेटण्यासाठी तुमच्यापासून २५-३० फूट अंतरावर येऊन पोहचलेला आहे व अचानक काही कारणाने तुमच्यासमोरच त्याच्या शरीराचा मृत्यु झाला तर तुमची अवस्था कशी असेल? अर्थात तुमची नष्टोमोहः स्थिती अंशमात्रही न हलता, अबाधित रहावयास हवी आणि ही नष्टोमोहः स्थिती अबाधित राहिली तर अंतिम श्वासापर्यंत तुमची स्मृतिर्लब्धा स्थितीही अबाधित राहिल.

महाविनाशात मृत्यु तर सर्वांचाच होणार आहे परंतु कुणाचा कधी होईल हे सांगता येणार नाही. मृत्युचे भय नष्ट होण्यासाठी देहाभिमानापासून अलिप्त राहून दुःखमुक्त, विकल्पमुक्त, विघ्नमुक्त आणि समस्यामुक्त स्थिती अर्थात संगमयुगी जीवनमुक्त स्थितीचा अनुभव करावा. या जीवन-मुक्त स्थितीत कर्मयोग करता करताच कर्मातीत स्थिती प्राप्त होईल. ही सर्वश्रेष्ठ स्थिती प्राप्त झाली की ना देहाची स्मृती, ना देहाच्या संबंधियांची स्मृती, ना देहाच्या दुनियेची स्मृती अंशमात्रही येणार नाही. **अंतिम समयी होवनहार देवतांच्या मनात हेच संकल्प असतील की या दुनियेचे हे विशाल नाटक संपत आले आहे. माझा प्राणप्रिय शिवबाबा मज आत्म्याला घरी घेऊन जाण्यासाठी आला आहे. त्याच्या हृदयसिंहासनावर बसून मी आत्मा परमधामी जाणार आहे. तत्पूर्वी परमात्म्याची प्रत्यक्षता आत्म्यांद्वारे व आत्म्यांची प्रत्यक्षता परमात्म्याद्वारे होईल.** ज्यावेळी ही प्रत्यक्षता होण्याचा क्षण येतो त्यावेळी पिताश्री ब्रह्माबाबा व मातेश्वरी सरस्वतीसह समस्त ब्राह्मण आत्मांचा साक्षात्कार विश्वाला होईल. साक्षात्कारामुळे परमात्म्याच्या महान कार्याचा व राजयोग्यांनी केलेल्या महान पुरुषार्थाचा अंदाज संपूर्ण विश्वाला होईल. हे विश्व त्यांचा एकमुखाने जयजयकार करेल. या जयजयकारानंतर महाविनाशाचा हाहाःकारही उडेल. त्याचवेळी प्रत्येक ब्राह्मण आत्म्याचे पुरुषार्थानुसार भिन्न-भिन्न माळेतील स्थान निश्चित झालेले असेल. (ब्राह्मणोंकी माला अंत में बनती है।) महाविनाशातील ब्रह्मावत्सांचा शारीरिक मृत्यु अत्यंत सहज व मंगलदायी होईल कारण या अमंगल शरीराचा त्याग केल्यानंतर त्यांना अल्पावधीतच देवतांचे मंगलमय शरीर धारण करावयाचे आहे. सोळा कला संपन्न झालेला प्रत्येक ब्राह्मण आत्मा पुढील कल्पातील आपल्या चौऱ्यांशी जन्मांसाठी निश्चिंत

▶ पान क्र. २४ वर

परमात्म शक्तीद्वारे महापरिवर्तनाचा समय

ब्र.कु.हेमंतभाई, शांतिवन (आबू रोड).

मनुष्य जीवनाचा उद्देश आहे सुखाची प्राप्ती. ऐन-केन प्रकारेण सुख प्राप्त व्हावे हेच एकमेव ध्येय मनुष्य ध्यानी-मनी बाळगतो. सुखासाठी जीवाचे रान करतो. कधी व्यक्तींमध्ये सुख शोधतो तर कधी पदार्थाच्या स्वादांमध्ये सुख चाखतो, कधी मनोरंजनाच्या साधनांनी सुख मिळवतो तर कधी सुखासाठी इवलसं छानसं घर असाव असही त्याला वाटत. खरोखरच आपल घर, एक सुख देणारी अशी वास्तु जेथे थकलेल्या तना-मनाला क्षणभरची विश्रांती मिळते. घर म्हणजे अस छप्पर ज्याखाली ज्यांना आपली माणसं म्हणू अशा दोनचार व्यक्ती गुण्यागोविंदानं नांदतात. जेथे पाहुण्यांचा यथोचित आदर सत्कार होतो. दोन चार जीवलग, नातलग, सगे-संबंधी ज्याठिकाणी एकतेच्या स्नेह सूत्रात, एकोप्याने राहतात त्यास आपण घर म्हणतो व घर मानतो.

याउलट खूप छान दिसणारा भला मोठा बंगला असेल. कदाचित त्यात अनेक अद्ययावत आधुनिक सुख-सुविधाही असतील. साधनांच्या सोबत संपत्तीही असेल पण प्रेमाने वाट पाहणारा कोणी नसेल, नातलग असूनही आपलं म्हणणारा नसेल, पैशा-अडक्यावरून वादविवाद होत असतील, ईर्ष्येने एकोप्याऐवजी भांडण-तंट्यांना पूर आलेला असेल, प्रेमापेक्षा पैशालाच जास्त किंमत दिली जात असेल अशा घरास आपण आपल घर तरी मानतो व म्हणतो का? **घर म्हणजे ज्यात खरं घरपण आहे. ज्यात वास्तव्य केल्यावर सुख मिळतं आणि जीवनाचा उद्देश सौख्यलाभ होतो वा सुखाचे ध्येय ज्या ठिकाणी पूर्ण होते त्यालाच घर म्हणतात.** एखाद्या लहान बाळाला विचारले की तुझे घर कोणतं तर तो आपल्या वडिलांच्या घराकडे बोट दाखवून सांगतो की हे माझं घर होय. खरे तर मुलाने ते घर बांधलेल नसतं किंवा विकत घेतललंही नसत. परंतु मातापित्याच्या पोटी जन्मास आल्यामुळे वडिलांच्या घराचा वारसदार बनून तो मालक सिद्ध होतो. म्हणजे 'हे आमच छान घर' अस जेव्हा बालक म्हणतो त्याअर्थी ज्या वास्तुत व्यवहार कुशल दिलदार मनाचा पिता, प्रेमाची वाहती गंगा आई, एकमेकाला समजून घेणारे स्नेहिल भाऊ-बहिणी राहत असतील त्याला आपलं हक्काचं घर मानतो. कुटुंबाच्या सुखासाठी स्नेह, संपत्ती व साधनांनी सुसज्ज घर आवश्यक असते. त्यामुळे सुखासाठी आई-वडिल (घराचे प्रमुख) सुखद घरकुलाची निर्मिती करतात.

परंतु निसर्ग नियमानुसार घराची पडझड होऊ लागते. एकेकाळी सुख देणारे घर दुःखदायी वाटू लागते, तेव्हा त्यात राहणे नकोसे होते. तरीही जुन्या झालेल्या घराची तो तात्पुरती डागडूजी करतो व कसेबसे काम भागवतो. जर दरवाजे वा खिडक्यांचा कडी-कोंडा तुटला तर सुताराद्वारे नवीन बसवतो. भिंतीचे प्लास्टर उखडले तर गवंड्याला बोलावून प्लास्टर करून घेतो. परंतु हे कुठपर्यंत चालणार. अखेर जर घर कोसळायलाच आले असेल तर पडक्या घरात राहणे धोक्याचे ठरते. **तेव्हा जुनाट व मोडकडीला आलेले घर पाडून नवीन घर बांधल्याशिवाय गत्यंतर नसते. परंतु हे करणार कोण? जुनं घर पाडून नवीन घर निर्माण करण्याची जबाबदारी घर प्रमुखाची असते.** कुटुंबाच्या सुखासाठी घरधनी तन-मन-धन लावून नवीन घर बांधतो, शारीरिक, मानसिक व आर्थिक शक्तीचा वापर करतो. हा झाला एका कुटुंबाच्या सुखासाठी प्रमुख (पित्याचा) घरधन्याचा प्रपंच.

जसे व्यक्तीसाठी घर तसे मनुष्य, प्राणी, पशु-पक्षी या सर्वांसाठी विश्व हे एक भले मोठे घरच नाही का? कारण संतांनीही या जगास हे विश्वची माझे घर म्हणून संबोधले आहे. या विश्वरूपी घराचा मालक ईश्वर आहे. **त्या सर्व आत्म्यांचा पिता परमात्म्यानेही आपल्या प्रिय वत्सांसाठी एकेकाळी (आदिकाळ सत्ययुगात) या सृष्टीवर सुरेख घर निर्माण केलं ज्याला आपण स्वर्ग (heaven), नंदनवन, वैकुंठ, पॅराडाइज्, बहिस्त म्हणतो. हे घर अतिशय सुख-कारक होते. मानव सर्वगुण संपन्न १६ कला संपूर्ण देवी-देवतांच्या रूपात नांदत होते.** जेथे अपार सुख-शांती आणि अफाट धन संपत्ती होती. हिरे-माणिक, मोतींनी सजलेले सोन्यांचे महाल होते. दुधा-तूपाच्या नद्या वाहत होत्या. गाय आणि वाघ एका घाटावर पाणी पित होते. निसर्गराजा

(प्रकृतीची पाचही तत्वं) देवी-देवतांचा दास बनून सेवा करीत होता. सत्ययुग संपले व त्रेतायुग आले. तेथे ही सुख शांतीची कमी कमतरता नव्हती तरी परिवर्तनाच्या नियमानुसार थोडी उतरती कळा झालीच. देवतांच्या १६ कलापासून १४ कला झाल्या. सत्ययुगी सतोप्रधान आत्मा सतोगुणी झाला. जसे एकदम नवीन बांधलेले घर व थोड्या जुन्या झालेल्या घराच्या सुखाची प्रत कमी होते त्याप्रमाणे त्रेतायुगी विश्वरूपी घराची सुखाची प्रत कमी झाली. तरी ते स्वर्गासम (सेमी स्वर्ग) सुखदायी होते. **सत्य व त्रेतायुगात एक राज्य, एक मत, एक भाषा, एक कुल व एकच आदि सनातन देवी-देवता धर्म होता. या दोन्हीही युगात हे विश्वरूपी घर स्वर्गिक सुखाचे आगार होते.**

सत्य-त्रेता ही दोन युगे सरली व सृष्टिचक्राचा अर्धा कल्पाचा काळ लोटला. सृष्टीरूपी घर जुने होऊ लागले. द्वापरयुग सुरू झाले. जसा सुर्यास्त झाल्याने अंधार पसरू लागतो व चंद्र, तारे, नक्षत्र उदयाला येतात त्याचप्रमाणे सृष्टी रंगमंचावर सत्य व त्रेता युगातील ब्रह्माचा दिन संपला व आदि सनातन देवी-देवता धर्मरूपी सत्याचा सूर्य अस्त झाला. अज्ञानाचा अंधार पसरू लागला. तेव्हा विश्व क्षितीजावर इब्राहिम, महात्मा बुद्ध, येशू ख्रिस्त, मुहम्मद पैगंबर, गुरुनानक इत्यादी धर्मस्थापकरूपी तारे, नक्षत्रे उजळू लागले. **जसे सूर्यप्रकाशाची कमी भरून काढण्यासाठी आपण घरात मेणबत्त्या, पणत्या, कंदिल लावतो किंवा वीजे सारख्या तात्पुरत्या कृत्रिम उजेडात काम भागवतो. त्याप्रमाणे द्वापर व कलियुगाच्या अज्ञान अंधाराच्या काळरात्रीत धर्मात्म्यांच्या द्वारे अल्प ज्ञानाचा प्रकाश पसरला गेला.** काळ पुढे सरकू लागला. कलियुगाच्या अंतिम समयी मात्र जसा अंधारात मानव ठेचा खातो व दुःखी होतो त्याप्रमाणे अज्ञानाचा अंधार जास्तच काळाकुट्ट झाला. पापकर्मांच्या ठेचा खाऊन मानव दुःखाने त्रस्त झाला. सृष्टीरूपी घर दुःखदायी झाले.

सुष्टीवर पसरलेल्या या अज्ञान अंधारात संत, महंत, ऋषी, मुनींनी ज्ञानाचे दीप प्रज्वलित केले. त्या ज्ञानप्रकाशात सत्कर्माच्या वाटेवर माणूस कसाबसा चालू लागला. परंतु जेव्हा समाजातून जीवनमुल्ये (सद्गुण) लुप्त होऊ लागले तेव्हा विचारवंत, नामवंत, गुणवंतांनी येऊन मुल्यांची पुनर्स्थापना करण्याचा प्रयत्न केला. जेव्हा समाज व्यवस्थेवर परकीयांचे आक्रमण झाले तेव्हा महात्मा गांधी, नेल्सन मंडेला यांसारख्या राजनेत्यांनी पडत्या घराला आधार द्यायचा प्रयत्न केला. प्रकृतीची पाच तत्वे तमोगुणी झाली. निसर्गराजा कोपल्याने कधी कडक उन्हाळा तर कधी अति हिवाळा, कधी अति पावसाळा तर कधी अति दुष्काळाने मानव बेजार झाला. तेव्हा वैज्ञानिकांनी येऊन निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न केला. परंतु विज्ञान त्यात फारसे सफल होऊ शकले नाही. **आज विश्वरूपी घर राहण्यायोग्य तरी राहिले आहे का? भरमसाठ वाढत्या जनसंख्येच्या विस्फोटामुळे जग दैनंदिन समस्यांचा बाजार बनला आहे. महागाई आभाळाला पोहचली आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागवणे कठीण झाले आहे.** जेथे गाय आणि वाघ एका घाटावर पाणी पित होते तेथे आज सख्खे भाऊ एका ताटात न खाता, जमीन जुमल्यासाठी एकमेकांचा गळा कापू लागलेत. देशामधले वादविवाद व आतंकवाद अति नंतर होणाऱ्या महायुद्धाची चाहूल देत आहेत. साधारण रयतेला जगणे कठीण झालयं.

खरोखरीच ज्याप्रमाणे जुनाट पडक्या घराला पाडल्याशिवाय गत्यंतर नसते त्याप्रमाणे आर्थिक, धार्मिक, सामाजिक व नैसर्गिक हे चार स्तंभ कमजोर झाल्याने वर्तमान विश्वरूपी घर मोडकळीला आले आहे. धर्मस्थापक, समाज सुधारक, राजनेते व वैज्ञानिक यांच्याद्वारे ठीक होण्यापलिकडे गेले आहे. धर्म अर्थात दैवी गुणांची धारण करण्याचे सोडून सर्व मानव जात परधर्म म्हणजे विकारी मार्ग स्वीकारीत आहेत. राजनीतिमध्ये भ्रष्टाचाराला तर पूरच आलेला आहे. प्रदुषणाचा राक्षस वातावरणास दुषित करीत आहे. त्याला ठीक करण्यात विज्ञानसत्ता ही निकामी ठरत आहे. मानवी अतिरेकाने धरतीही त्रासली आहे. मग आता तोडक्यामोडक्या विश्वरूपी घरास कोण ठीक करणार? जुन्या निकामी विश्वाचे परिवर्तन कोण करणार? **ज्या सृष्टीरूपी घरास ठीक करण्यासाठी धर्मसत्ता, राजसत्ता व विज्ञानसत्ता या तीनही सत्तांचीच शक्ती अपुरी पडत आहे तेव्हा कोणती शक्ती उदयाला येईल व या विश्वाला विध्वंसापासून वाचवेल?**

या जगाला वाचवेल तो ईश्वरच. या जगाला ठीक करणारा सर्वशक्तिवान परमात्माच आहे. त्याचे अमर्याद सागरासारखे बळच जगबुडी टाळू शकेल. म्हणूनच परमात्म्याची महिमा 'बिगडी को बनानेवाला' अशी केली जाते.

वर्तमानसमयी कलियुगाचे भयानक तांडव नृत्य चाललेले आहे. चहुकडे काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकाराचे साम्राज्य आहे. कामवासनेने मानवाची दृष्टी-वृत्ती राक्षसी बनवली आहे. बलात्काराने माता-बहिणींची इज्जत लुटल्या जाण्याच्या घटनांना ऊत आलेला आहे. क्रोधाने आतंकवादाला जन्म देऊन अनेकांचे प्राण घेतले आहेत. लोभवृत्तीने भ्रष्टाचाराला जन्म दिला आहे. मोहामुळे विनाशी देह व देहाच्या संबंधामध्ये व्यक्तीची मती मारली जात आहे आणि घरोघरी धृतराष्ट्र व गांधारी धनाचा दुरुपयोग करणाऱ्या दुर्योधनास जन्म देत आहे. कुदृष्टी-कुवृत्तीने ग्रासलेले दुसऱ्यांना दुःखदायी शासनाने गांजविणारे दुःशासन घरोघरी बघायला मिळत आहेत. त्यामुळे महाभारताचा महाभारी विनाशकाळच तोंड फाडून उभा ठाकलेला आहे. या विश्वास परिवर्तन केल्यानेच विश्वाचे कल्याण होणार आहे.

म्हणून परमात्मा शक्ती जी केवळ मानवालाच नव्हे परंतु प्रकृती (प्रदुषित झालेली पाच तत्वे) पशु-पक्षी, जीव-जंतूचा ही उद्धार करण्यास समर्थ आहे. एक निराकार शिव परमात्मा हाच सर्वशक्तिवान आहे. त्याच्या अनंत, अपार ज्ञान, गुण, शक्तीनेच विकृत झालेले विश्व ठीक होऊ शकेल. धर्मनेते, राजनेते, विज्ञाननेते यांच्या मानवी शक्तीने केव्हाच हात वर उचलेले आहेत. जसे रात्रीच्या अंतिम प्रहरी अंधाराच्या साम्राज्याला नाहिसे करून जीवनाची गाडी पुन्हा चालवायची असेल तर सूर्याला उदय व्हावेच लागते तेव्हाच सूर्यप्रकाशात असणाऱ्या शक्तीने जीवन पूर्ववत होते. कारण चंद्र परप्रकाशित (सूर्याद्वारे प्रकाशित) आणि पणत्या, मेणबत्त्या कृत्रिमरित्या प्रकाशित असल्याने त्यात जीवनदायी शक्ती नसते, त्यामुळे त्यांच्या प्रकाशात शरीराची व पीकाची वाढ होत नाही कारण हा प्रकाश कृत्रिम असल्याने त्यात जीवनदायी शक्ती नसते. त्याचप्रकारे धर्मस्थापकांनी आत्मिक शक्तीद्वारे स्थापित केलेल्या धर्मांमध्ये विश्व परिवर्तनाची शक्ती नसल्यामुळे त्यांच्या धर्मांची शक्ती फक्त पापकर्मांना तात्पुरता आळा घालते. परंतु मुल्यहीन, चरित्रहीन झालेल्या मानवाला, तमोप्रधान प्रकृतीला आणि ढासळलेल्या निसर्गचक्राला ठीक करण्याची अमर्यादित शक्ती त्यांच्यात नाही. हे कार्य करण्याची क्षमता आणि शक्ती प्रकृतीपती परमात्म्यातच आहे.

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत' अर्थात जेव्हा जेव्हा धर्माची ग्लानी होते तेव्हा अनेक धर्मांचा विनाश करून एक सतधर्माची स्थापना करण्यासाठी मी येतो, या गीतेत दिलेल्या वचनाला पूर्ण करण्याची हीच वेळ नाही का? कारण 'हिंदू-मुस्लिम-सिख-ईसाई आपस में भाई भाई' ही धर्माची भातृत्व भावना नाहिशी झालेली दिसते. धर्माच्या नावावर लूट व लढाया होत आहेत. पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश या पाच तत्वांनी स्वाभाविक गुणधर्म सोडून आपले संतापलेले रूप वादळ, सुनामी, भूकंप इत्यादी नैसर्गिक प्रकोपांद्वारे दाखविलेले आहे. निसर्गाचा प्रकोप व विकारांचा संताप मानव जीवनाचा सर्वनाश करण्यास उतावीळ झालेला आहे. **विश्व विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे. आता कसे वाचेल विश्वरूपी घर? याचे एकच समाधान आहे, महापरिवर्तन, महापरिवर्तन आणि महापरिवर्तन. परमात्म शक्तीद्वारेच असे महापरिवर्तन घडू शकेल कारण मानव, प्रकृती व प्राणीमात्रास परिवर्तन करण्याची महान शक्ती त्या जगत्नियंत्या प्रेमळ प्रभूतच आहे.**

म्हणूनच तो दयाळू, कृपाळू प्रभू परमात्मा कलिकालाच्या घोर अज्ञान रात्रीच्या अंतिम प्रहरी अवतरित झालेला आहे. एक साधारण मानवी शरीराचा आधार घेऊन विश्वाच्या महापरिवर्तनाचे कार्य तो करीत आहे. विश्वाच्या महापरिवर्तनासाठी प्रजापिता ब्रह्माबाबा हे ईश्वराचं माध्यम बनले आहेत. वर्तमान समय हा कलियुगाचा अंत व सत्य-युगाचा आरंभ यांचा संधीकाळ आहे. हा संधीकाळ म्हणजे हिरेतुल्य पुरुषोत्तम संगमयुग होय. परमात्म शक्तींच्या अनुभूतीद्वारे स्वपरिवर्तनाची शक्ती प्राप्त करण्याचा अनमोल समय आहे. आज लाखो स्त्री-पुरुष, अबाल-वृद्ध, शिक्षित-अशिक्षित साऱ्या जगातील जन-जन ईश्वरी आगमनाचा संदेश प्राप्त करून, मन बुद्धीचे नाते ईश्वराशी जोडून, स्वपरिवर्तन

▶ पान क्र. २० वर

ज्ञानबीजाला स्नेहाचे पाणी द्या

ब्र.कु.भावना, पटेल (मुंबई).

कित्येक ब्रह्मावत्स शिवबाबांशी आत्मिक सुखसंवाद (रुहरिहान) करतानासुद्धा ही तक्रार करतात की, 'ज्ञान तर बुद्धीत आहेच, ब्राह्मणही झालो, आत्म्यालाही जाणले, शिवबाबांनाही पूर्ण परिचयाने जाणले. संबंधांचीही माहिती आहे. सृष्टिचक्राचे तसेच रचयिता व रचना यांचेही सारे ज्ञान आहे तरीही शिवबाबांची आठवण (याद) सहज का होत नाही? आनंदाचा, शक्तीचा वा शांतीचा अनुभव का होत नाही? मेहनतीने आठवण का येते? ती निरंतर का रहात नाही? वारंवार आठवण (याद) का विसरली जाते?' याचे कारण आहे ते म्हणजे ज्ञान बुद्धीपर्यंतच आहे, ज्ञाना-बरोबर अंतःकरणात ईश्वरी स्नेह कमी आहे.

मी मुलगा आहे, तो पिता आहे, दाता आहे, विधाता आहे हे तर केवळ बुद्धिगम्य ज्ञान झाले, परंतु हेच ज्ञान जेव्हा अंतःकरणात सामावले जाते तेव्हा मग ज्ञान व स्नेह एकत्र होतात. **ज्ञान बीज तर स्नेह पाणी होय. जर बीजाला पाणी मिळाले नाही तर ते फळ देणार नाही. ज्ञान तर आहे पण अंतःकरणाचा स्नेह नसेल तर प्राप्तीचे फळ मिळणार नाही. म्हणून मेहनत करावी लागते. स्नेह मागील हिशेबही चुकता करतो. स्नेह ही एक विशेष अनुभूती आहे तेव्हा स्वतःच स्वतःला विचारा की ज्ञानाबरोबर अंतःकरणाचा स्नेह आहे का?** अंतःकरणात गळती (लीकेज) तर नाही. कोणत्याही प्रकारे दैहिक दुनियेशी स्नेह अर्थात जिव्हाळा (लगाव) मग तो संकल्पमात्र वा वाणीमात्र असो वा कर्मात असो याला गळती म्हटले जाईल. गळती असल्यास शक्ती वाढत नाही आणि शक्ती नसल्यास शिवबाबांचे स्मरण करण्यास मेहनत लागते आणि मेहनत लागल्याने संतुष्टता (तृप्ती) रहात नाही. जेथे संतुष्टताच नसेल तेथे क्षणात स्मरणाच्या अनुभूतीने मस्तीत मस्त रहाल आणि दुसऱ्या क्षणी मनोभग्न (दिलशिकस्त) व्हाल. ज्यांच्याविषयी ईर्ष्या वा घृणा असेल तेथेही बुद्धीचा झुकाव असल्याने वारंवार तेच आठवत राहतील. तुम्ही योगात शिवबाबांचे स्मरण करण्यास बसाल आणि स्मरणात येईल तोच ज्याच्याविषयी ईर्ष्या वा घृणा आहे. विचार कराल मी स्वदर्शन चक्रधारी आहे आणि फिरवाल परदर्शनचक्र. म्हणून दोन्ही बाजू नीट तपासा. केवळ शुष्क ज्ञानी होऊ नका. केवळ बुद्धिगम्य ज्ञानीही होऊ नका तर ज्ञानाबरोबरच अंतःकरणीय स्नेही व्हा आणि गळतीला (लीकेजस्ला) मुळीच थारा देऊ नका.

▶ पान क्र. १९ वरून

करून विश्वपरिवर्तनाच्या कार्यात सहभागी झालेले आहेत. म्हणून सर्व आत्मिक बंधू आणि भगिनींनो नजीकच्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या शाखेत जाऊन ईश्वरीय शक्ती प्राप्त करा व स्वपरिवर्तनाद्वारे विश्वपरिवर्तनात सहयोगी बना. तसेच नवीन विश्वात (सत्ययुगी स्वर्गरूपी घरात) स्थान मिळवा. अशीच आपणा सर्वांसाठी प्रेमसागर शिवपित्याची हार्दिक शुभेच्छा आहे.

❖❖❖

अमृतवेळी अमृतकुंभ देतसे...

भाग्य आमुचे वर्णू किती, शिवबाबा आमुचा पिता।
अमृतवेळी अमृतकुंभ देतसे, स्वये आमुच्या हाता।। धृ. ।।

शाश्वत सुख लाभे सकळा, हेवा वाटे भाग्याचा।
सर्व संबंधांची अनुभूती होई, क्षण हा सौख्याचा।
मन आनंदाने नाचत राही, नवनीत येई हाता।
अमृतवेळी अमृतकुंभ देतसे, स्वये आमुच्या हाता।। १ ।।

परमात्याशी जोडी नाते, अतूट क्षण हा स्नेहाचा।
चैतन्याशी चैतन्याचा, महासंगम असे मीलनाचा।
समिधा टाका विकारांच्या, या महायज्ञात आता।
अमृतवेळी अमृतकुंभ देतसे, स्वये आमुच्या हाता।। २ ।।

ज्ञान शलाका घेऊनी हाती, धन्य धन्य व्हावे।
जन्मोजन्मीचा हा अमोल ठेवा, रोज लुटत जावे।
अगाध महिमा या वेळेचा, वर्णू किती आता।
अमृतवेळी अमृतकुंभ देतसे, स्वये आमुच्या हाता।। ३ ।।

(ब्र. कु. संजीवनी, खोपोली)

जेथे व्यर्थ तेथे अनर्थ

ब्र.कु.गुणवंत पाटील, बिबवेवाडी, पुणे.

संकल्पांची जननी आहे मन. आज आमची मने मलीन आरशासारखी झाली आहेत. हे मळभ आहे व्यर्थतेचे, नकारात्मकतेचे. असे मन कमजोर, दुर्बलही असते. त्यामुळे त्यात व्यर्थ संकल्पांची सदा गर्दी झालेली असते. व्यर्थ संकल्प अतिवृष्टीसारखे असतात. त्यात तथ्य कमी असते, म्हणून त्यावर पथ्य हवे. हे व्यर्थ संकल्प नकारात्मक असतील तसेच विनाशकारीही असतील म्हणून हे टाळण्यासाठी नेहमी सकारात्मक, विधायक विचार केले पाहिजेत. **मी जसा विचार करेल तसा बनेल म्हणून मला चारचौघांसारखा विचार न करता, परमात्मा शिव जे सांगतात तसा विचार करायचा आहे. अशी खबरदारी, दक्षता घेतली तर मी अनेक व्यर्थांपासून, विघ्नांपासून स्वतःला वाचवू शकेन. अन्यथा अनर्थाला आमंत्रण देण्यासारखे होईल.** तेव्हा ज्या विचारांनी काहीच फायदा नाही, कल्याण नाही असे संकल्प मी का करावेत? हा माझा वादा नव्हे इरादा हवा. उलटे-सुलटे विचार केल्याने कधी-कधी प्राणावरही बेतू शकते, हे वेळीच ध्यानात घेतले पाहिजे.

❒ संकल्पांचा प्रभाव

एकदा एक राजा आपल्या राजधानीत फिरत होता. सोबत त्याचा मंत्रीही होता. रस्त्यात एका व्यापाऱ्याला पाहताच राजाने त्याला फाशी देण्याचा हुकूम सोडला. मंत्री ते ऐकून हैराण झाला. त्याला माहित होते की या व्यापाऱ्याने काहीच गुन्हा केला नाही. मंत्री व्यापाऱ्याला भेटला तेव्हा व्यापारी म्हणाला, माझी लाकडाची वखार आहे. माझ्या वखारीत अत्यंत महागडे चंदनाचे लाकूड आले आहे. माझ्या मनात फार दिवसांपासून विचार येतो आहे की हे चंदन कोण घेईल? हो, जर राजाचा मृत्यू झाला तर या चंदनाचा उपयोग होईल. मंत्र्याच्या सारे लक्षात आले. त्याने सांगितले राजाने मला तुमच्याकडे पाठविले आहे. राजाला मंदिरासाठी चंदनाचे लाकूड हवे आहे. चंदनाची किंमत सांग. व्यापारी खूष झाला. त्याने विचार केला की राजा किती दयाळू आहे. त्याला राजाबद्दल फार आदर वाटला. तीन दिवसानंतर राजाने मंत्र्याला अचानक बोलावले आणि विचारले, 'व्यापाऱ्याला फाशी तर नाही दिली?' मंत्र्याने सांगितले, 'नाही'. राजा म्हणाला, 'बरं झालं. व्यापाऱ्याला फाशी देऊ नका. तो फार चांगला माणूस आहे. कां माहित नाही माझ्या मनात असे वाईट विचार का आले?' मंत्र्याने राजाला खरं खरं सांगितले. हा संकल्पांचा प्रभाव, परिणाम होता. म्हणून मनात उठणाऱ्या संकल्पांकडे लक्ष दिले पाहिजे. त्याची फार गरज आहे.

संकल्पशक्तीत क्रांती घडविण्याची ताकद आहे. ब्रह्माने संकल्पाने सृष्टी रचली असे शास्त्रात गायन आहे. आम्ही तर ब्रह्माचे पुत्र आहोत. सृष्टीवर स्वर्ग रचण्याचे दायित्व आम्हा ब्रह्मावत्सांचे आहे. म्हणूनच आमचे संकल्प, विचार किती श्रेष्ठ, समर्थ, शुभ व कल्याणकारी असावेत याची जाणीव होईल. जेव्हा हे सारं काही बिघडलं, अशुद्ध झालं, व्यर्थ वाढलं तेव्हाच स्वर्गाचा नरक झाला. तेव्हा आमची विचार करण्याची, चिंतनाची दिशा आणि दशा निर्धारीत करण्याची गरज आहे. **व्यर्थ चिंतनातून मुक्त होण्यासाठी तीन गोष्टींवर जोर दिला पाहिजे. १) स्वचिंतन, २) स्वदर्शन, ३) श्रीमत. याच वेळी तीन गोष्टींचाही प्रयत्नपूर्वक त्याग केला पाहिजे; १) परचिंतन, २) परदर्शन, ३) मनमत वा परमत.**

❒ स्वचिंतनाचे महत्व

स्वचिंतनाच्या प्रक्रियेत आत मनात, चित्तधारेत सुखद व आनंदाच्या संवेदना, भावना लहरत असतात. या संवेदनांचा प्रकट प्रत्यय आपल्या स्वभावात येत असतो. बाह्य जीवनातही त्याचे पडसाद उमटत असतात. शुद्ध विचारांनी अंतरंगात समता येते. त्यामुळे आपल्या मन, वाणी, कर्मात शुद्धता, पवित्रता येते. स्वच्छ मनातच समज वाढते. त्यामुळे आचारात, संपर्कात समंजसपणा येतो. स्वचिंतक हा अंतर्मुखीही असतो. आत्म-अभिमानी स्थितीत जगणे हा त्याचा स्थायीभाव होतो. स्वतःचे गुण-अवगुण याची त्याला यथार्थ जाण असल्याने तो सरळ स्वभावी असतो. सरळ स्वभावाच्या व्यक्तीचे मन व्यर्थ गोष्टी, व्यर्थ विचार यापासून सदा मुक्त असते. सरळता ही चित्ताची विशुद्धता आहे.

सरळ स्वभावी व्यक्ती वेळकाळ, परिस्थितीनुसार स्वतःला घडवित (mould) असते. इतरांच्या संस्काराशी सहज मिळवून घेते. व्यर्थ संघर्ष वा वाद टाळते. त्यामुळे तिला जीवनात पुरेसे स्वास्थ्य लाभते. संघर्ष वा वाद टाळणे हा सहनशीलतेचा विशेष गुण आहे, कमजोरीचा नव्हे. जीवनातील शांतीसाठी हा स्वभाव विशेष मोलाचा असतो.

याउलट परचिंतनाने मन कुटिल होते. कुटिल मन मलीन असते. ही मलीनता अनर्थकारी आहे. आसक्ती, तृष्णा, लोभ, अहंकार, कुदृष्टी यामुळे मनाची सरळता धोक्यात येते. त्याची स्वच्छता, शुद्धता नाहीशी होते. मन कुटिल होणे, मलीन होणे, याचा अर्थ मनाला गाठी मारणे. गाठी मारणे हे दुःखद आहे. निंदा, ईर्ष्या, द्वेष यांनी या गाठी मारल्या जातात म्हणून खरं सुख या गाठी सोडविण्यात आहे. गाठी सोडणे म्हणजे व्यर्थापासून मुक्ती.

जेव्हा गाठी सुटतात तेव्हा मन भयमुक्त बनून शक्तिशाली होते. अशा मनात दयेची, करुणेची, कल्याणाची सद्भावना, शुभभावना कायम वाढते. कोणी कसा का असेना, निंदकही असू दे पण माझी भावना बिघडू नये, प्रदुषित होऊ नये. **कोणी माझे अहित वा नुकसान करीत असेल तरीही मला त्या व्यक्तीबद्दल वैराची, बदल्याची नव्हे तर कल्याणाची, उपकाराची सद्भावना ठेवली पाहिजे. दुर्भावना ठेवणे महाव्यर्थच नव्हे तर अनर्थकारी आहे.**

एकदा महाराजा रणजितसिंग आपल्या सैन्यासह कुठे चालले होते. तेवढ्यात एक दगड भिरभिरत आला आणि त्यांच्या डोक्याला लागला. डोके फुटले व रक्त भळाभळा वाहू लागले. अचानक घडलेल्या या प्रसंगाने सर्वत्र गोंधळ उडाला. दगड मारणाऱ्याचा शोध सुरू झाला. थोड्या वेळाने सैनिक एका दुबळ्या वृद्धाला पकडून घेऊन आले. वृद्ध भीतीने थरथरत होता. त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते. 'महाराज, मी निरपराधी आहे. भुकेल्या मुलासाठी फळ पाडत होतो.' महाराजाने वृद्धाला धीर दिला आणि सत्य सांगायला सांगितले. 'महाराज, फांदीवरची कैरी पाडण्यासाठी दगड फेकला पण तो चुकून तुम्हाला लागला. क्षमा करा, महाराज.' राजा म्हणाला, 'दगड लागला असता तर कैरी पडली असती आणि भुकेल्या मुलाला खायला मिळाली असती. हो ना?' 'हो महाराज.' वृद्ध थरथरत्या आवाजात कापत म्हणाला. 'परंतु आता तर दगड राजा रणजितसिंगाला लागला आहे. तो आंब्याला न लागता, वाया नाही गेला पण आता तुला व तुझ्या मुलाला स्वादिष्ट भोजन मिळेल.' वृद्ध आश्चर्यचकित झाला. राजाच्या बरोबरची मंडळी व सैनिकही चक्रावले. पण राजाच्या चेहऱ्यावर स्मित हास्य तरळत होते. राजाने आज्ञा केली की या वृद्धाला वर्षभर पुरेल एवढे धान्य व रोख रुपये पाच हजार द्यावेत. हे दुसरे आश्चर्य!

बरोबरच्या मंडळीतील एकजण म्हणाला, 'महाराज, आपण काय करता आहात? अपराध्याला दंडाऐवजी इनाम देत आहात. पंजाब केसरी शांतपणे म्हणाला, 'अरे भाई, **जेव्हा निर्जीव झाडही दगडाचा घाव सहन करून गोड फळे देते, आपण तर सजीव माणसं आहोत. कोणी कळत न कळत आमची निंदा करू दे, नुकसान करू दे. आम्हाला सर्वांचं कल्याण केलं पाहिजे, सर्वांना सुख दिलं पाहिजे. मोठं व्हायचं असेल तर मित्रा वृक्षाकडूनही शिकले पाहिजे.'**

❒ स्वदर्शन चक्रधारी बना

मी विश्वकल्याणकारी आत्मा आहे, हा माझा श्रेष्ठ स्वमान आहे. या सीटवर बसून मला ब्रह्माबापसमान सदैव मनाची तपासणी करीत माझ्या कर्मेंद्रियांना श्रीमत अनुसार चालवायचे आहे तर माझे व्यर्थ विचारचक्र समाप्त होईल. खरं तर मी आहे स्वदर्शन चक्रधारी पण आज कर्मेंद्रियांच्या चक्रव्यूहात अडकलो आहे. अनेक व्यर्थाच्या चक्रव्यूहात फसल्याने मनाची ठेवण बिघडली आहे. अशुद्ध झाली आहे. जीवनाची परिमितता अर्थात मर्यादा धोक्यात आली आहे. त्यामुळे व्यर्थ क्रियाकर्म वाढली आहेत. हात, पाय, डोळे, कान, नाक, वाणी, मन यांच्यावरचा ताबा सुटल्यामुळे सत्कर्म फारशी होत नाहीत. विकर्म, पापकर्म जास्त होतात त्यामुळे बेहदचे वैराग्य व विवेक यापासून आत्मा दूर जात आहे.

ज्याने मन जिंकले तो अनेक व्यर्थापासून मुक्त होतो. अभ्यास आणि वैराग्य ही मन जिंकण्याची साधने आहेत. वैराग्याने समदृष्टी येते. स्वतःप्रमाणेच समस्त सृष्टीवरही विश्वास दृढ होतो. दृष्टी उजळते, शुभ होते. सर्वत्र व्यर्थ पाहण्यापेक्षा मंगल पाहा, सार पाहा म्हणजे चित्तशुद्धी होईल, मन शांत होईल. सारी सृष्टी भगवंताची अमानत

आहे, हा निश्चय मुक्तीचा मार्ग दाखविल. आपण ब्रह्मावत्स योग करतो, तपस्या करतो ती स्वकल्याणासाठीच नाही तर इतरांच्या भल्यासाठीही असते. अपराध्याला दंड वा शाप देण्यासाठी नाही. पण याउलट झालं तर तो पुरुषार्थ व्यर्थ ठरेल. तसेच योगानं प्राप्त झालेल्या सिद्धी देखील मुक्तीच्या मार्गातील अडथळा ठरतील.

स्वामी रामकृष्णांनी या संदर्भात सांगितलेली गोष्ट मोठी उद्‌बोधक आहे. एका योग्याने २० वर्षांच्या योगसाधनेने पाण्यावर चालण्याची सिद्धी मिळवली. मग पाण्यावरून चालत येत तो स्वामीजींना म्हणाला, 'पाहिलंत मी कसा पाण्यावरून चालत आलो.' रामकृष्ण म्हणाले, 'हा काय योग आहे? ही काय सिद्धी आहे? दोन पैसे देऊन नावेतून नदी पार करता येते. त्यासाठी २० वर्षे साधना करण्याची गरज काय? २० वर्षांच्या साधनेची किंमत काय २ पैसे?' योगाची अशी सिद्धी व्यर्थच आहे ना!

❒ श्रीमतानुसार आचरण

अमृतवेलेपासून रात्रीपर्यंतच्या प्रत्येक कर्मासाठी शिवबाबाने मुरलीतून श्रीमत दिले आहे. ज्ञानासोबतच जीवनात धारणा पक्की व्हावी त्याद्वारे जगणे हे सुखमय, सुंदर, आदर्श व्हावे अशा अनेक गोष्टी शिवपिता शिकवतो. मुरली ही जीवन जगण्याची कला शिकवते. अनेक व्यर्थांपासून मुक्त करते. जीवनात अनेक समस्या, प्रसंग, विपरीत परिस्थिती येतात. पण हे नाटक आहे. दोन घडीचा डाव आहे अशा भूमिकेत जर आपण जगलो, वावरलो तर जगणे सोपे सरळ, आनंददायी होईल. ड्रामाचा ज्ञान बिंदू जगण्याची नवी सकारात्मक दृष्टी देतो. नाटकाचे प्रत्येक दृश्य कल्याणकारी आहे, मौजेचे आहे. या जगण्यात विश्व-कल्याणकारी शिवपित्याचा आश्वासक हात सदा सोबत आहे मग भय कशाचे?

इंग्रजीत एक सुंदर वाक्य आहे - 'Fear is a dark room where all negatives are developed.' **जेथे व्यर्थामुळे अनर्थ होतो अशी अंधार कोठडी म्हणजे भीती. भीती व नीति एकत्र कशा नांदतील? त्यामुळेच आज भय व दुविधा यांच्यामुळे समाजात दुःख आणि अराजकता वाढली आहे.** एक संत राजाकडे पाहुणा म्हणून आला. तेथे तीन पिंजरे ठेवले होते. एका पिंजऱ्यात उंदीर होता. त्याच्या पुढ्यात सुकामेवा पडला होता. दुसऱ्यात एक मांजर होती. तिच्यासमोर मलईने भरलेली वाटी होती. तिसऱ्या पिंजऱ्यात एक गिधाड होते. त्याच्या पुढ्यात एक मांसाचा तुकडा टाकलेला होता. खरं तर तीघेही भुकेले होते. पण समोर ठेवलेल्या पदार्थाला तोंडही लावत नव्हते. राजाने संताला याचे कारण विचारले. संत म्हणाला, 'राजा उंदीर मांजरीला भीत आहे तर मांजरीला गिधाडाचं भय आहे. गिधाडाला तशी कुणाची भीती नाही पण ते प्रलोभनात पडलं आहे की पहिल्यांदा उंदीर खाऊ की मांजर. या दुविधेमुळे पुढ्यात मांस असूनही तो उपाशी आहे. दीर्घकाळ जर अशीच परिस्थिती राहिली तर तीघेही भूकेने तडफडून मरतील. नेमकी हीच अवस्था आज मनुष्य-प्राण्याची झाली आहे.'

निर्भयतेची शक्ती धारण करण्यासाठी आत्मदर्शन, आत्मनिरीक्षण आणि आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. **आत्मदर्शनाने आपले सत्यस्वरूप आणि स्वस्वरूप कळते. आत्मनिरीक्षणाने आपल्या मर्यादा, क्षमतांची ओळख होते तर आत्मपरिक्षणात आपल्या चुकांची, दोषांची अवगुणांची जाणीव अर्थात आकलन होते. या सर्वांच्या एकत्रित परिणामाने सत्यतेची शक्ती मिळते.** निरंतर अभ्यासाने स्व-परिवर्तनाची दिशा सापडते. संकल्पात सत्यता आणि दिव्यता येते. सत्यता सिद्ध करावी लागत नाही. या शक्तीच्या अनुभूतीने खुशी वाढते, प्रसन्नता येते.

❒ व्यर्थपासून मुक्ती

मी आत्म-अभिमानी आहे, हा माझा श्रेष्ठ स्वमान आहे. या स्वमानावर आधारित स्वस्थिती कायम राहिली तर प्रभुदत्त शक्ती व्यर्थ जाणार नाहीत. या शक्ती मला स्वकल्याणासोबतच इतर आत्म्यांच्या कल्याणासाठी वापरणे हे माझे जीवित कार्य व्हावे. जगण्याचे लक्ष्य, उद्दिष्ट्य व्हावे. **या शक्ती व्यर्थ जाऊ नयेत यासाठी सदैव एक मंत्र याद केला पाहिजे, 'मी व्यर्थ बोलणार नाही, व्यर्थ पाहणार नाही, व्यर्थ ऐकणार नाही, व्यर्थ विचार करणार नाही आणि आपला वेळ व्यर्थ घालविणार नाही.'**

शेतात तण अर्थात व्यर्थ गवत फोफावले की मुख्य

पिकाची हानी होते म्हणून शेतकरी निंदणी, कोळपणी करून तणाचा बंदोबस्त करतो. जसे पिकात तण व्यर्थ आहे, त्याने अनर्थ, नुकसान होते, उत्पादन घटते, शेतीचे अर्थकारण बिघडते. म्हणून व्यर्थ हे कुठल्याही स्वरूपाचे असो ते संपवलेच पाहिजे. शेतकरी शेतीची मशागत करून तण वाढू देत नाही, पिकाचे रक्षण करतो. मग जी गोष्ट शेतकऱ्याला कळते ती साधकाला, पुरुषार्थीला कळत नाही असे कसे म्हणता येईल? **व्यर्थ संकल्प, व्यर्थ साधन, व्यर्थ इच्छा, अवाजवी उद्दिष्टचे हे साधनेतील मोठे अडथळेच नव्हे तर संकटे आहेत**. त्यांचा सामना त्यांना मुळापासून समाप्त करण्यात आहे. Prevention is better than cure. हे कालातीत सत्य आहे, पथ्य आहे. त्याची बूज राखण्यातच शहाणपण आहे तरच पुरुषार्थ सफल, सिद्ध होईल. ज्याला पोतामेल अर्थात जमाखर्च ठेवण्याची, तपासण्याची सवय आहे त्यालाच व्यर्थ-समर्थ उमजते. अन्यथा गोष्ट बिघडू शकते. चेकिंग करण्याचे यंत्र आहे आमची दिव्य बुद्धी. दिव्य बुद्धीने केलेले चेकिंगच यथार्थ चेकिंग आहे. त्यामुळे चेंज होणे सोपे होईल. विजयी होता येईल. म्हणून स्वतःच स्वतःचा मॅग्निफायिंग ग्लास झाले पाहिजे.

अनुमान लावणे हेही व्यर्थच आहे, कारण ते सत्यापासून खूप दूर असू शकते. ज्ञान व अज्ञान यात जेवढा फरक आहे तेवढाच फरक अनुमान आणि सत्यात असतो. एक कुत्रा रात्रभर भुंकत होता म्हणून झोप आली नाही. अर्धी रात्र कुत्र्याला शिव्या देण्यात गेली. सकाळी उठल्यावर समजलं की रात्री कॉलनीत चोर आले होते. आपल्या घराकडे पण ते फिरकले होते पण कुत्र्याच्या निरंतर भुंकण्याने ते पळून गेले. कुत्र्याला शिव्या देणारा कॉलनी-तला तोच मनुष्य आता कुत्र्याची वाहवाह करू लागला. अशाप्रकारे अनुमानही अंधश्रद्धाच आहे. दादीजी नेहमी म्हणायच्या अनुमान लावणारा हनुमान कसा होणार?

आपले जीवन हे प्रकृती, संस्कृती, विकृती यांचा खेळ आहे. योग्य कर्म, योग्य विचार, भूक लागली की खाणे ही प्रकृती आहे. याउलट व्यर्थ कर्म, व्यर्थ विचार, संकल्प, भूक नसताना खाणे ही विकृती आहे. संस्कृती याहून वेगळी, श्रेष्ठ विचारधारा, जीवनपद्धती आहे. दुसऱ्याच्या हितासाठी राबणे, काम करणे, इतरांबद्दल शुभभावना, शुभकामना बाळगणे, भूक असतानाही ताटातील अर्धी भाकरी दुसऱ्याला देणे ही आहे संस्कृती. म्हणूनच आज संस्कृती संवर्धनासाठी, रक्षणासाठी विकृती संपविण्याची गरज आहे. असे होईल तेव्हाच शिवपित्याला अभिप्रेत असलेल्या संस्कृतीचे नवनीत भारतीय संस्कृती, दैवी दुनियेचा उदय होईल. आपल्या साऱ्या चिंता, ओझी शिवपित्यावर सोपवून आम्ही निर्धास्त, निश्चिंततेचा अनुभव करू शकू. हे हलकेपण (lightness) आम्हाला बेफिक्र बादशहा बनविल. पोट भरणे सोपे आहे, पेटी नाही. ही संस्कृती आहे. या संस्कृतीचे आम्ही रक्षक आहोत.

'कम खर्च बाला नशीन व्हा' असे शिवपिता वारंवार का सांगतात कारण व्यर्थ खर्च हाही दोष आहे. तो दुरुस्त केला पाहिजे. म्हणून 'दिल मोठे करा व बील छोटे करा' अशी एक जाहिरात बऱ्याचदा येते. म्हणून ती मला फार भावते, ती खरच अनुकरणीय आहे. आपली प्रवृत्ती हा एक यज्ञ आहे. या यज्ञातील स्थूल वस्तू, पदार्थ, अन्न, भोजन जर व्यर्थ वाया घालवले तर त्या पापाचा बोझ संबंधित आत्म्यावर चढतो. तसेच आपले संकल्प, बोल, वेळ, शक्ती यांचा खजिना जर व्यर्थ उधळला, गमावला तर तेही शिरावर पाप वाढवणेच आहे. **ही सर्व ईश्वरीय अमानत आहे. तिचा सेवेसाठी योग्य विनियोग, वापर हा आम्हा ईश्वरी सेवाधारी बह्मावत्सांची जबाबदारी आहे. भक्तीत जसा प्रसादाचा कण-कण पवित्र मानून त्याच्या सेवनात धन्यता मानतात तसेच ज्ञानातही मन, बुद्धी, वेळ हा ईश्वरीय प्रसाद आहे. तो सफल केला पाहिजे.** ❖❖❖

▶ पान क्र. १६ वरून

होईल. अशी प्रदीर्घ कालीन निश्चिंती करवून देणारा एकमात्र सद्गुरु निराकार शिव परमात्माच असू शकतो.

अशाप्रकारे निश्चिंत झालेल्या प्रत्येक आत्म्याच्या मनी हाच दृढ संकल्प असेल की भूतकाळातील अनेक कल्प मज आत्म्याने चौऱ्यांशीचे हे पार्ट बजाविले आहेत. नूतन कल्पातही हे पार्ट बजावयाचे आहेत व भविष्यातील प्रत्येक कल्पात हेच पार्ट बजावयाचे आहेत. केवळ संगमयुगावरच हा उद्गार मुखातून बाहेर पडू शकतो की 'बाबा नथिंग न्यू!'. ❖❖

विघ्नातूनच सफलतेची प्राप्ती

ब्र.कु.भगवान भाई, शांतिवन (आबू रोड).

मे आणि जून २०१४ मध्ये मला आसाम, त्रिपुरा व मेघालय या भागात ईश्वरी सेवेसाठी जाण्याचे सद्भाग्य लाभले. माउंट आबूपासून सर्वात दूरचा हा प्रवास आहे. त्यामुळे तेथील ब्रह्मावत्सांमध्ये खूप भावना आहेत. भौतिक दृष्ट्या तो प्रदेश चांगला आहे. परंतु वर्तमानसमयी या भागात अनेक प्रकारच्या समस्या आहेत. लोकांमध्ये भीती व तणाव फार आहे कारण हा भाग विभिन्न देशांच्या सीमांनी घेरलेला आहे. तेथील बंधु-भगिनींनी मला अनेक प्रकारचे प्रश्न विचारले. उदाहरणार्थ आमच्या जीवनात विभिन्न प्रकारची विघ्ने येतात, पारिवारीक परिस्थितीच्या रूपाने, कर्मभोगाच्या रूपाने, मनोविकाराच्या रूपाने. अशा वेळी आम्ही काय करावे? सर्वात जास्त तर हाच प्रश्न होता की दुसऱ्याकडून जेव्हा आमची निंदा होते किंवा आमचा सन्मान केला जात नाही, अपमान सहन करावा लागतो, अशावेळी आमची स्थिती खराब होते, मनात व्यर्थ चिंतन चालते, मनाची एकाग्रता होत नाही, अशावेळी योगसुद्धा लागत नाही. तर मग काय करावे?

जीवनामध्ये जर अशाप्रकारची विघ्ने असतील तर साहजिकच आपसामध्ये स्वभाव-संस्काराची टक्कर होत राहते. परिणामतः तणाव वाढत जातो. अशावेळी मनामध्ये क्रोध उत्पन्न होतो. या क्रोधाच्या आहारी जाऊन केलेल्या कृत्यामुळे कधी-कधी जीवनभर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. **यापासून स्वतःला वाचविण्यासाठी आध्यात्मिक ज्ञान, राजयोगाचा नियमित अभ्यास व ईश्वरी नियम-मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे कारण याद्वारेच आपले मनोबल वाढते, आत्मअभिमानी स्थिती बनते तसेच अतींद्रिय सुख लाभते. अशा सुखापुढे विघ्न अतिशय गौण व लहान वाटतात.**

❒ विघ्नांना घाबरू नका

जीवनातील सुख-दुःख, लाभ-हानी, जय-पराजय हा तर एक खेळ आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतातच त्याप्रमाणे जीवनामध्ये या दोन्हीपैकी काहीना काही येतच रहाणार. त्याला पाहून घाबरून जायची गरज नाही. परंतु लक्षात ठेवा की विघ्न हे काही कायमस्वरूपी आपल्याजवळ रहाणार नाही. **जसे सूर्यासमोर कधी-कधी काळे ढग येतात आणि थोड्यावेळाने ते निघून जातात तसेच जीवनातील विघ्न ही सुद्धा येतात व जातात देखील. जीवनातील असफलतेनंतरच सफलता प्राप्त होत असते. म्हणूनच अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, असे म्हटले जाते.** इतिहासात अशा अनेक थोर पुरुषांची जीवन कहाणी आपण वाचतो. यासंदर्भात अमेरिकेचे राष्ट्रपती अब्राहम लिंकन यांचे उदाहरण विशेष उल्लेखनीय आहे.

ते वयाच्या २१व्या वर्षी व्यापारात असफल झाले, २२व्या वर्षी एका निवडणूकीत हरले. २४व्या वर्षी ते पुन्हा व्यापारात असफल झाले. वयाच्या २६व्या वर्षी त्यांच्या पत्नीचा देहांत झाला. २७व्या वर्षी त्यांचे मानसिक संतुलन बिघडले. ३४व्या वर्षी ते काँग्रेसची निवडणूक हरले. ४५व्या वर्षी ते सिनेटची निवडणूक हरले. ४७व्या वर्षी ते उपराष्ट्रपती बनण्याच्या प्रयत्नात असफल राहिले. नंतर ४९व्या वर्षी ते सिनेटची निवडणूक हरले आणि वयाच्या ५२व्या वर्षी ते अमेरिकेचे राष्ट्रपती म्हणून निवडून आले. त्यांना काय आपण जीवनात असफल म्हणणार? ते वारंवार असफल झाल्यानंतर देखील निराश झाले नाहीत. त्यांनी सर्व प्रकारच्या विघ्नांवर मात करून, सफलतेचे शिखर गाठले. दुसरं एक उदाहरण नमूद करावसं वाटतं.

जगप्रसिद्ध महान वैज्ञानिक अलबर्ट आईनस्टाइन हे देखील शालेय जीवनात एक बुद्धु विद्यार्थी म्हणून गणले जात होते. त्यांना पुढील सात जन्मात गणित येणार नाही असे त्यांचे अध्यापक म्हणत असत. परंतु त्यांनी कधीच हिंमत सोडली नाही. अनेकदा त्यांना असफलतेला तोंड द्यावे लागले तरी त्यांनी विद्या अध्ययन सोडले नाही. अधिक लक्षपूर्वक अध्ययन चालूच ठेवले. शेवटी अविरत प्रयत्नांच्या जोरावर ते विश्वविख्यात शास्त्रज्ञ बनले. तात्पर्य म्हणजे जीवनात येणाऱ्या विघ्नांना पार करण्यासाठी हिंमत, धैर्य, आत्म-विश्वास, एकाग्रता, दृढता अशा सद्गुणांची धारणा आवश्यक

आहे. त्याद्वारेच जीवनात हमखास सफलता प्राप्त होते.

❒ विघ्नांमुळेच मजबूती येते

जेवढे आपण जीवनात विघ्नांना सामोरे जातो तेवढे आपण मजबूत व अनुभवी होत जातो. जेवढी कठीण परीक्षा तेवढी स्थिती शक्तिशाली बनते. शिल्पकाराद्वारे छन्नी व हातोड्याचे घाव सहन केल्यानेच मूर्ती मंदिरात ठेवण्यासाठी योग्य बनते. साधारण मातीला साच्यात घालून भट्टीत भाजल्यानेच वीट मजबूत होते. **ज्याप्रमाणे सोन्याला अग्निमध्ये तापवल्यानंतर ते शुद्ध होते त्याप्रमाणे जीवनात जेव्हा विभिन्न प्रकारचे विघ्न येतात तेव्हा मनात वैराग्याची भावना निर्माण होते. परिणामतः मन आपोआपच ईश्वरी स्मृतीत रमू लागते.**

❒ निंदकाचे घर असावे शेजारी

आजकाल दुसऱ्याकडून केली जाणारी निंदा, हे विघ्न सर्वात जास्त आहे. जी व्यक्ती आपली निंदा करते, तिच्याविषयी मनात वैरभावना निर्माण होतो. त्यामुळे आपल्या संबंधात दुरावा निर्माण होतो. परंतु सदैव लक्षात ठेवा की जो आपली निंदा करतो, तोच आपला खरा मित्र असतो. कारण निंदा करणारी व्यक्ती आपल्यातील अवगुण बाहेर काढण्यासाठी मदतगार असतो. त्यामुळे जर कोणी आपली निंदा केली तर अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करा व आपल्यातील कमी-कमजोरी दूर करण्याचा प्रयत्न करा. म्हणून संत कबीर म्हणतात -

निंदक नीरे राखीये, अंगन कुटी बंधाए।
बिन पानी, बिन साबुन, निर्मल करे स्वभाव।

अर्थात जो कोणी आपली निंदा करतो त्याला आपल्या घरासमोर रहाण्यासाठी झोपडी बांधून द्या कारण तो पाणी आणि साबणाविना आपला स्वभाव निर्मल करतो. त्यामुळे निंदकाला मनःपूर्वक धन्यवाद द्या. त्याच्याविषयी शुभभावना ठेवा म्हणजे आपण हलके बनू शकू. आपला योग लागू शकेल व स्थिती निर्विघ्न बनू शकेल.

तसेच आपली अवास्तव प्रशंसा करणाऱ्यापासून आपले कान बंद करा कारण अशी प्रशंसा एखाद्या फुग्याप्रमाणे, मिथ्या अभिमानाने आपल्याला फुगवत असते. अशा परिस्थितीत जर कोणी अपशब्द वा अपमानाची सुई टोचली तरी तो फुगा फुटतो म्हणून अवास्तव वा व्यर्थ प्रशंसा करणाऱ्यांपासून सावध रहा.

❒ विघ्न हे सफलतेसाठी वरदान

शिक्षणासोबत परीक्षा, जीवनासोबत कसोटी व समुद्रासोबत लाटा असा नियमच आहे. त्यामुळे जोपर्यंत जीवनात आपली कसोटी होत नाही तोपर्यंत आपले कल्याण होऊ शकत नाही. ज्याला आपण समस्या वा विघ्न म्हणतो तेच आपल्या जीवनातील सफलतेसाठी परमात्म्याने दिलेली संधी किंवा वरदान असते. हे लक्षात ठेवा की अनुकूल परिस्थितीमध्ये आपला विवेक झोपलेला असतो आणि विघ्न किंवा प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपला विवेक जागृत राहतो. **म्हणूनच म्हटले जाते की ठोकर खाणाराच ठाकूर (देवता) बनतो. त्यामुळे जीवनातील विघ्नांना वरदान समजून सदैव जागृत राहा तेव्हाच आपली उन्नती होत राहिल.**

वर्तमानसमयी आपल्यासमोर येणारी विघ्नं ही आपल्या भविष्यामध्ये सफलतेचे वरदान घेऊन येत आहेत. म्हणून त्या विघ्नांना न घाबरता, आपली स्थिती मजबूत ठेवणे गरजेचे आहे. जीवनातील विघ्न आपल्याच कोणत्या ना कोणत्या जन्मातील कर्माचा हिशोब आहे असं समजून निश्चिंत राहा. माझे स्वतःचे लहानपणापासूनचे जीवन अतिशय संघर्षमय राहिले. परंतु ते संघर्षच माझ्या उन्नतीचे साधन कसे बनले हे मी मागील लेखातून वेळोवेळी व्यक्त केले आहे. मुख्य म्हणजे यावर्षी शिवबाबांनी आपल्याला निर्विघ्न बनण्याचे होमवर्क दिले आहे. त्यासाठी कुठलेही विघ्न आले तरी त्यातदेखील आपले कल्याण सामावलेले आहे असे समजून नेहमी खूश राहा. कुठल्याही प्रकारचे विघ्न वा समस्या जरी आली तरी तिच्या अधीन होऊ नका. जसे आपण एखादा खेळ खेळतो तसे अगदी सहजपणे समस्या पार करा. बाहेरून ती कितीही मोठी दिसत असली तरी हे लक्षात ठेवा की हा सगळा खेळ आहे, एक ड्रामा आहे व ड्रामामधील आपण हिरो पार्टधारी आहोत. **तात्पर्य म्हणजे कुठल्याही समस्येला खेळ समजून तिला हलके बनवा. तिच्यामुळे आपल्या मनावर कुठलेही ओझे बाळगू नका म्हणजे आपण जीवनात सदा सफलता प्राप्त करून वैजयंती माळेचे मणी बनू शकू.** ❖❖❖

आपुल्या सत्कर्मांची गाथा, करील परमात्म प्रत्यक्षता

-- ब्र.कु.प्रमोद, पेण.

आपले जीवन सदा प्रसन्न, आनंदी आणि बहारदार असावे, असे प्रत्येकाला वाटत असते. त्यासाठी आत्म्याची बॅटरी पूर्णपणे चार्ज (जागृत) करणे आवश्यक आहे. भक्तिमार्गी मनुष्य देवी-देवतांना भजतो-पूजतो. शास्त्र-ग्रंथाची पारायणे करतो. उपास-तापास व नवस-सायास करतो. तरी देखील तो जीवनात सफलता प्राप्त करू शकत नाही याचे कारण काय बरे? **परमात्म्याशी डायरेक्ट कनेक्शन अभावी आत्म्याची बॅटरी फूल चार्ज नसते म्हणून भक्तीचे फळ एका जन्मापुरते मर्यादित असते. भक्तीची पुढची पायरी म्हणजे ज्ञान. म्हणूनच ज्ञानाला भक्तीचे फळ म्हटले जाते. या ज्ञानाने श्रेष्ठ पुरुषार्थ घडतो.** श्रेष्ठ पुरुषार्थासाठी आपले कर्म आणि विधी यामध्ये समानता हवी म्हणजे सत्यज्ञान प्रत्ययास येईल. विधीचा अभाव असेल तर कर्म अपुरे राहते, अतृप्ती वाढते. यथार्थ विधी-शिवाय सिद्धी प्राप्त होत नाही. विधीयुक्त कर्म ही एक कला आहे. ही कला ईश्वरीय ज्ञानातून प्राप्त होते. आपण ज्या भावनेने कर्म करतो त्यानुसार त्याची परतफेड होते. सूर्य व प्रकाश, धरती व आकाश, दिवा व उजेड, आशिक व माशुक याप्रमाणे कर्म व फळ यांच्यात अतूट संबंध आहे. **संकल्प हे कर्माचे बीज आहे. संकल्पानुसार कर्म घडते. संकल्प जितका शुद्ध व श्रेष्ठ त्यानुसार कर्म शक्ति-शाली बनते. कल्याणकारी उदात्त हेतूने व शुभ भावनेने केल्या जाणाऱ्या कर्मातून जीवनात खरी सुख-शांती व संतुष्टता येते.** पण विकारी, दुर्भावनेतून, दुसऱ्यांना दुःख व त्रास देण्याच्या हेतूने केले जाणारे कर्म, पापकर्म ठरते. केवळ प्रसिद्धी व नावलौकिक यासाठी केली जाणारी कर्मे दिखाऊ आणि भपकेबाज असतात. अशी कर्मे कनिष्ठ प्रतीची तर निष्काम भावनेने केलेली कर्मे श्रेष्ठ प्रतीची शाश्वत व टिकावू असतात.

बहुसंख्य लोक हे जग निर्माणच का झाले? अशी विचारणा करतात. आमच्यासाठी निर्माण झालेल्या या जगात आम्हाला मनसोक्त-स्वैर वागण्याची मुभा का नाही? हा त्यांचा सवाल आहे. तर काही बेफिकीर लोक रात्रंदिवस भौतिक सुखे लुटण्यातच दंग असतात. ही सुखे अल्पकालीन क्षणभंगूर आहेत, वाळवंटातील मृगतृष्णे समान आहेत, ही सुखे म्हणजे अळवावरचे पाणी आहे; याचा त्यांना विसर पडलेला असतो. देहअभिमानापायी त्यांना नियम-मर्यादांचे भान नसते. त्यामुळे 'खाओ-पिओ और मौज करो' असे भोगी-विलासी जीवन ते जगत असतात. पूर्वजन्मांचे संस्कार व कर्माच्या गुह्य गतिचे अज्ञान यामुळे काही लोकांना आपले कर्म कुटीत बसण्याची सवय असते. घडून गेलेल्या गोष्टींबद्दल खेद बाळगून ते आपल्या नशिबाला दोष देतात. सतत हाय-हाय आणि 'व्हाय-व्हाय' करीत कुढत राहतात. भूतकालीन आठवणींचे भूत जागे करून सतत विवंचनेत असतात. अशावेळी 'इथे फुलांना मरण जन्मता, दगडांना पण चिरंजीविता। बोरी बाभळी उगाच जगति, चंदन माथी कुठार।' या गीताचा भावार्थ जाणण्यासाठी साक्षी स्थिती हवी. नथिंग न्यू चा पाठ पक्का हवा आहे. अन्यथा अशी माणसे शारीरिक व मानसिक दृष्ट्या कमजोर होतात. आजारी पडतात. त्यांना समयसूचकतेचे भान नसतेच एकप्रकारे ते बुद्धिभ्रष्ट होतात.

वास्तविक आपणच आपल्या कर्माला जबाबदार असतो. अन्य कोणी नव्हे. त्यामुळे आत्मपरीक्षण करण्याऐवजी दुसऱ्याच्या माथी खापर फोडणे, दुसऱ्यांना दोषी ठरविणे व स्वतः कुढत राहणे ही मोठी चूक आहे. ज्याप्रकारचे कर्म करतो, त्यानुसार आपल्या वाट्याला सुख वा दुःख, यश अथवा अपयश येते. **खरे तर हे जग आपल्या कर्मांनीच निर्माण झाले आहे. पाप आणि पुण्य, स्वर्ग आणि नरक आपल्या कर्माचीच फलश्रुती आहे. सृष्टिचक्रानुसार आपणच उन्नतीची शिडी चढतो आणि उतरतोही.** आपण त्या जगत्पित्याचे, विश्वकर्माचे वारस आहोत. त्यामुळे नव्या दुनियेच्या स्थापनेसाठी निमित्त बनून आपणाकडून रचनात्मक श्रेष्ठ कर्मे झाली पाहिजेत. सत्कर्मे घडली पाहिजेत. यासाठी सावधानता हवी. बुद्धियोग परमात्मा

पित्याशी जोडायला हवा. योग महत्वाचा आहे. योगीच स्थितप्रज्ञ असतो. त्याची प्रज्ञा स्थिर असते. स्थितप्रज्ञ मनुष्य त्रिकालदर्शी, त्रिकालज्ञानी असतो. त्याच्या ठायी आदि-मध्य-अंताचे ज्ञान असते.

कर्मेंद्रियांचा आधार घेतलेल्या प्रत्येकाला शरीर निर्वाह अर्थ कर्मे करावीच लागतात. कर्म करताना आपल्या हातून विकर्म घडू नये यासाठी कोणती कर्मे करावीत व कोणती टाळावीत याचे ज्ञान हवे. निर्णय शक्ती हवी. कोणीही देहधारी गुरु, गोसावी, साधू वा ज्योतिषी हे यथार्थ ज्ञान देऊ शकत नाही. याक्षणी आज कोणताही देहधारी मनुष्य संपूर्ण पावन नाही. तो पतित पावन होऊ शकत नाही. सत्यज्ञान केवळ ज्ञानसागर परमात्माच देतो. तोच दाता-विधाता-वरदाता आहे. सत्यम्-शिवम्-सुंदरम् आहे. त्याच्या संगाने स्मृतिर्लब्धा अर्थात स्मृतिस्वरूप माणूस देवमाणूस बनतो. ज्याप्रमाणे चंदनाचा सुवास मातीला लागतो. दिव्याच्या उजेडाने प्रकाश पसरतो तसे सत्कर्मी व्यक्तिंच्या संगतीत नेहमी श्रेष्ठ कर्मे घडतात. म्हणून लक्षात असू द्या की आपणाकडून घडणारी सत्कर्मे ही परमात्म्याकडून प्राप्त होणाऱ्या गुणांचा आविष्कार असतो. प्रभूसंगाचा रंग आत्म्यावर चढतो. आत्मा पवित्र होतो. मुख्य म्हणजे पवित्रतेची धारणा ही श्रेष्ठ कर्माचा पाया आहे. पवित्रतेच्या धारणेने अतींद्रिय सुखाची प्राप्ती होते. तात्पर्य, सुख वा दुःख ईश्वराच्या इच्छेने घडत नाहीत तर आपण करीत असलेल्या कर्माचा तो आविष्कार आहे.

जसे शेतकऱ्याने पावसाळ्याच्या सुरुवातीला शेतात पेरणी केली पाहिजे, शिल्पकाराने मूर्ती घडविण्यासाठी मेहनत घेतली पाहिजे, व्यापाऱ्याने सचोटीने धंदा केला पाहिजे. **तसे संपूर्ण कल्पात सुखाची प्राप्ती व दुःखापासून दूर राहण्यासाठी आपण आता संगमयुगात श्रेष्ठ कर्मे करण्याचा पुरुषार्थ करायला हवा. संत तुकारामांनी एका अभंगात म्हटले आहे -**

चांगल्या कामाला, लागावे कधीही।
गोड फळे येती, कष्ट घेता।।
दुष्ट कामे केली, शुभ वेळे वरी।
माफी नाही तरी, शिक्षेतूनी।।

या पुरुषोत्तम संगमसमयी नव्या दुनियेच्या स्थापनेसाठी परमपिता परमात्मा शिवबाबांनी आपल्याला संस्कार मीलनाची रास करायला सांगितली आहे. संस्कार मीलन होण्यासाठी आपण एकमेकांची विशेषता जाणायला हवी. सत्ययुगात सुखधामामध्ये पूर्णतः संस्कार मीलनाची रास असते. याकरिता संगमयुगात आत्म्यांमध्ये संस्कार मीलन होणे जरूरीचे आहे. संस्कार मीलनासाठी सहयोग शक्ती हवी. योगी हा सहयोगी असतो. सहयोगी बनण्यासाठी संगमयुगामध्ये संस्कार मीलनाची रास करणे आवश्यक आहे. बापदादांनी ॲडॉप्ट केलेल्या प्रत्येक आत्म्यामध्ये विशेषता भरलेली आहे. शिवबाबा म्हणतात, 'प्रत्येक आत्मा विशेष आत्मा आहे.' म्हणून आपण एकमेकांची गुण विशेषता जाणायला हवी. पारखण्याच्या शक्तीने विशेषता जाणता येते. राजयोगाने पारखण्याची शक्ती आत्मसात होते तसेच स्वपरिवर्तन घडते आणि आधीच्या ६३ जन्मांचे विकर्मांचे ओझे हलके होते.

आज दुनियेत 'अरे' ला 'कारे' म्हणण्याची, जशास तसे वागण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्याने मला मान दिला तर मी त्याचा सन्मान करेन, असे वागणे हे अज्ञान आहे. देहअभिमान आहे. **शिवबाबा म्हणतात, 'परचिंतन पतन की जड है।' परचिंतन, परदर्शन व परमत हे तीन पर (पंख) काटून पर उपकार अर्थात परोपकार भावना वाढवली पाहिजे. प्रथम मी स्वतःमध्ये परिवर्तन करेन असा निर्धार केला तर स्वपरिवर्तनातून आपोआप विश्वपरिवर्तन घडेल.** विश्वपरिवर्तन व्हावे यासाठी ज्ञानमुरलीतून प्राणप्यारे शिवबाबा वारंवार ब्रह्मावत्सांना शिकवण देतात, 'स्वदर्शन-चक्रधारी बना, विचारसागर मंथन करा, स्वमानात रहा व मनसा सेवा करा'. त्याचबरोबर ज्ञानसूर्य शिवबाबांनी आपल्या लाडक्या मुलांकडून श्रेष्ठ कर्मे घडावीत यासाठी दिव्यज्ञान प्रदान केले आहे. त्यातील ज्ञानबिंदू पुढीलप्रमाणे-

❒ कर्मेंद्रियांचा राजा होऊन कर्मे करावीत

आपण कोण आहोत? कोठून आलो आहोत? कशासाठी जगतो आहोत? यासंबंधीच्या अज्ञानापायी माणूस देह-अभिमानी बनतो. देहअभिमान सर्व विकारांचे मूळ आहे. त्यातून दुःख व अशांती उद्भवते. चिंता-काळजी व ताण-

तणाव वाढून विकर्म घडतात. त्यामुळे स्वास्थ्य बिघडते. उदाहरणार्थ, दारुड्या दारुविना, धुम्रपानी विडी-सिगारेट-विना अस्वस्थ होतो. इंद्रियवश माणूस आपल्या मनावर संयम ठेवू शकत नाही. तो विपरीत बुद्धी बनतो. स्वैराचारी वर्तनाने वाईट सवयींच्या आहारी जातो. कर्मेंद्रियांचा गुलाम बनतो. व्यर्थ बडबड करणे, निंदा-नालस्ती करणे, शिवीगाळ करणे, खोटेपणा, लपवा-छपवी करणे, भांडण-तंटे वाढविणे इत्यादी अपप्रवृत्तींच्या आहारी जातो. तमोप्रधान बनतो.

सध्याच्या भौतिक दुनियेमध्ये कर्मेंद्रियांचा राजा होणे, कर्मेंद्रियांवर विजय मिळविणे तितकेसे सोपे नाही. कठीण आहे. पण आपला स्वतःवर व पिता परमात्म्यावर आणि ड्रामावर अतूट विश्वास असेल तर अशक्य काहीही नाही. निश्चय महत्वाचा आहे. 'निश्चय बुद्धी विजयंति।' निश्चय-बुद्धी मनुष्यच श्रेष्ठ कर्म करतो, अंगद समान विजयी होतो.

❒ समतोल ठेवून आनंदाने कर्मे करावीत

बुद्धिरूपी तराजूचा काटा समतोल (सम+तोल) असेल तर अचुक निर्णय घेता येतो. बुद्धीचा अंकूश असेल तर मन हेलकावे खात नाही. स्थिर राहते. **निरंतर परमात्म-स्मृतीने मनुष्याची अवस्था एकरस राहते. माणसाची जशी अवस्था असेल तशी व्यवस्था होते. खाण तशी माती. बीज तसे फळ. संकल्प तशी सिद्धी.** म्हणून आपली अवस्था सदा सुस्थित-सुव्यवस्थित असली पाहिजे. त्यासाठी सदा समतोल रहायला हवे. समतोल वृत्तीचा माणूस निंदा-स्तुती, हानी-लाभ, मान-अपमान आदी सर्व प्रसंगी एकरस असतो व आनंदाने कर्म करतो. स्वदर्शनचक्रधारी समतोल राखतो. आनंदी राहतो. जसे अपघात होऊ नये म्हणून विमान उड्डाणा-पूर्वी विमानाची पूर्ण तपासणी केली जाते. आगगाडी धावण्या-पूर्वी रेल्वे इंजिन व सर्व डब्यांची पूर्ण तपासणी होते. तसे आपली शरीररूपी गाडी व मनरूपी ड्रायव्हर कर्म करण्या-साठी कितपत योग्य आहेत याची चेकिंग होणे आवश्यक आहे. त्यासाठी आत्मनिरीक्षण हवे. शुभचिंतक बनावे. शुभचिंतक सदा आनंदी असतो. शुभचिंतनाने मनाची अवस्था समतोल राहते आणि अशा माणसाकडून श्रेष्ठ कर्म घडते.

❒ विश्वस्त होऊन कर्मे करावीत

आज जगात सर्वत्र दुःख-अशांती, कलह-क्लेश वाढत आहेत. या दुष्ट चक्रातून सुटण्यासाठी शिव परमात्म्याने योगयुक्त होऊन कर्म करा असा संदेश दिला आहे. 'योगस्थ कुरु कर्माणि' हे गीतावचन आहे त्यानुसार प्रत्येकाने योग-युक्त होऊन 'मी' पणाचा त्याग करायला हवा. निमित्त भावाने रहावे. ट्रस्टी बनावे. जसे होडी पाण्यात आहे, पण होडीत पाणी नसेल तर हलकेपणे होडी पाण्यामध्ये सहज तरंगेल व किनारा गाठील. पण होडीत पाणी शिरले तर जडत्वाने होडीला जलसमाधी मिळेल. या संसार सागरामध्ये जीवनाची होडी तरंगायची असेल व यशाचा किनारा गाठायचा असेल तर या दुःखमय अशांत दुनियेमध्ये आपण सुरक्षित (सु-रक्षित) राहिलो पाहिजे. मनरूपी होडीतील अवगुणांचा उपसा केला पाहिजे. निर्विकारी बनले पाहिजे. निमित्तभावाने विश्वस्त होऊन कर्म केले पाहिजे. यासाठी सदैव लक्षात ठेवा की 'परमधाम हे माझे कायमचे निवासस्थान आहे. तेथून मी एकटा आलो आहे. मी यात्रेकरू आहे. या दुनियेत मी मुसाफिर आहे. काही दिवसांपुरता सोबती आहे. सृष्टीरूपी रंगमंचावर माझी तात्पुरती भूमिका आहे. श्रेष्ठ कर्म करून मी माझी भूमिका पार करीत आहे.'

❒ चूकीची कबुली करून, तणावमुक्त होऊन कर्मे करावीत

वर्तमानसमयी कर्म करणाऱ्या प्रत्येक माणसाकडून अनेक चूका होत असतात. त्यामुळे चुकणे हा कलियुगी माणसाचा स्थायीभाव झालेला आहे. एकप्रकारे माणूस चूकांचा पुतळाच बनला आहे. **शिवबाबा म्हणतात, कोणतीही चूक अक्षम्य नाही. घडलेली चूक पिता परमात्म्यापाशी मोकळ्या मनाने कबूल करावी. चूक कबूल केली तर अर्धा गुन्हा माफ होतो. मनावरील दडपण कमी होते. टेंशन (तणाव) जाते व अटेंशन (लक्ष) राहते. ताण-तणाव दूर होतो. माणूस तणावमुक्त तसेच शारीरिक व मानसिक व्याधीमुक्त होतो.**

स्वार्थी व लोभी माणसाचा कल, झालेली चूक लपविण्या-कडे असतो. चूक लपविण्यासाठी तो खोटे बोलतो. एकदा खोटे बोललो की, अनेक चूकांची मालिका लागते. त्यामुळे संकटात अधिक भर पडते. बुडत्याचा पाय खोलात जातो. समस्यांचा गुंता वाढतो. विकर्मे घडतात. म्हणून चूकांची

पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेली चूक कबुल करणे शहाणपणाचे आहे. **आपण सरळमार्गी व पारदर्शी जीवन जगले पाहिजे. न्यारे व प्यारे बनले पाहिजे. असे जीवन जगणे म्हणजे काट्यामध्ये गुलाब, चिखलात कमळ, वाळवंटात हिरवळ, समुद्रात दीपस्तंभ आणि अंधारात काजव्याप्रमाणे शोभून दिसणारे आहे.**

❒ श्रीमतानुसार कर्मे करावीत

ज्ञानसागर शिव परमात्म्याने आपल्या ज्ञानमुरलीतून दिलेली शिकवण म्हणजेच श्रीमत होय. या कलियुगी दुनियेत अनेक मतमतांतरे आहेत. ती आपण पाहू या--

मनमत - मनमत म्हणजे स्वतःचे (स्वैर) मत. मनात येईल तसे वागणे व त्यानुसार कर्म करणे. आजच्या जगात कोणीही माणूस परिपूर्ण नाही म्हणूनच तो अल्पज्ञ आहे. अशा माणसाचे मन घोड्यासारखे सैरावैरा धावते. ते अस्थिर व चंचल आहे. मनमतानुसार वागल्याने चूका उद्‌भवतात. विकर्म वाढतात.

परमत - देहधारी मनुष्याच्या मतानुसार वागणे म्हणजे परमत होय. परमत कायम नसते. दुसऱ्यांची मते परिस्थितीनुसार बदलणारी असतात.एक ना धड भाराभर चिंध्या अशी ती मते असतात. त्यामुळे परमत प्रमाण मानल्याने विकर्मे घडतात व माणूस दुःखसागरात गटांगळ्या खातो. तो सुखाचे पैलतीर गाठू शकत नाही. परमतामध्ये विविधता आढळते. म्हणून परमत व्यभिचारी व दुःखदायी आहे.

शास्त्रमत - द्वापरयुगामध्ये ऋषी-मुनींनी तत्कालिन समाजाला जागे करण्यासाठी शास्त्रे लिहिली. शास्त्राला प्रमाण मानणे म्हणजे शास्त्रमत होय. आज बदलत्या परिस्थितीनुसार जुन्या काळातील शास्त्रातील ज्ञान कालबाह्य झाले आहे. 'आटे मे नमक' इतकेच ज्ञान शास्त्रामध्ये आढळते. म्हणून शास्त्रात अनेक अंश, टीका, तळटीपा, विवरणे आढळतात. सद्यस्थितीत शास्त्रमत अचूक नाही. शास्त्रातील ज्ञान त्या त्या काळापुरते मर्यादित असते म्हणून पुराणातील वांगी पुराणात राहू द्या असे म्हटले आहे.

श्रीमत - कलियुगाच्या अंती पुरुषोत्तम संगमयुगामध्ये परमपिता शिव परमात्मा, ब्रह्मातनात अवतरित होऊन सर्व मनुष्य आत्म्यांना जे दिव्यज्ञान देतात, ती शिकवण म्हणजे श्रीमत होय. श्रीमत म्हणजे श्रेष्ठ मत वा सर्वोच्च मत. निराकार परमात्मा सर्व मनुष्य आत्म्यांचा बाप, टीचर व सद्‌गुरु आहे. बाप आपल्या मुलांची मोठ्या प्रेमाने पालना करतो. टीचर ज्ञानमुरलीद्वारे शिकवतो व सद्‌गुरु मुक्ती-जीवनमुक्ती अर्थात सद्‌गती देतो. म्हणून आपण सदैव श्रीमतानुसार कर्म केले पाहिजे. परमात्मा सर्वज्ञ व सर्व शक्तिवान आहे. आपली प्रत्येकाची या जन्माची व यापूर्वीच्या अनेक जन्मांची कुंडली व कर्मखाते केवळ तोच जाणतो. आपली खरी योग्यता व कमतरता त्यालाच माहित आहे. म्हणून त्याने दाखविले त्या मार्गानुसार आचरण करण्यात आपणा सर्वांचे कल्याण आहे. श्रीमत प्रमाण वागणारा माणूस परमात्म्याचा प्रिय मदतनीस व सखा बनतो. श्रीमतानुसार वागल्याने दैवी गुणांची धारणा होते. माणसाचा देवमाणूस बनतो व अशा माणसाकडून सदा श्रेष्ठ कर्म घडते. म्हणून हे ईश्वरीय ज्ञान पडत्या फळाची आज्ञा समजून धारण केले पाहिजे. 'शुभस्य शिघ्रम' आता नाही तर कधीच नाही.

'टू लेट'चा बोर्ड लागण्याआधी सत्कर्म करण्याची हीच सर्वोत्तम वेळ आहे कारण अंतिम समयाची परीक्षा एक सेकंदाची असणार आहे. 'अंत मति सो गति' प्राप्त होणार आहे. त्यासाठी आपण स्वयंपसंत, प्रभूपसंत आणि परिवार पसंत बनले पाहिजे. दोन पर्याय आहेत. अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालो तर बिंदीधारी सूर्यवंशी १६ कला संपूर्ण, मर्यादा पुरुषोत्तम श्रीकृष्णाच्या सत्ययुगात प्रवेश मिळणार आहे आणि नापास होणाऱ्यांना १४ कला संपन्न धनुर्धारी श्रीरामाच्या त्रेतायुगामध्ये चंद्रवंशी घराण्यात जन्म मिळणार आहे. **म्हणून विनाशाच्या अंतिम घडीची वाट न पाहता, प्रत्येक क्षण अंतिम घडी समजून वेळेचा सदुपयोग केला पाहिजे. सत्कर्म करण्यात समय सफल केला पाहिजे. त्यासाठी तीव्र पुरुषार्थ व ज्वालामुखी योग करण्याची तसेच अंतिम समय समीप आणण्याची हीच खरी वेळ आहे. ब्रह्माबापसमान बनण्याची आणि शिवबाबांना आपल्या चलन व चेहऱ्याद्वारे प्रत्यक्ष करण्याची हीच सर्वोत्तम संधी आहे.**

सारांशाने असे म्हणता येईल,

शुभ कर्मोमें देरी न करो, साँसों का भरोसा नही।
जिदगी सफल अब करो, साँसों का भरोसा नही।

माझी भक्ती फळा आली, मजवरी शिवकृपा झाली

(अनुभव) *ब्र.कु.भैय्या साकुरे, भंडारा.*

मी गेल्या ४२ वर्षापासून भक्ती-मार्गात चालत होतो. गुरुपासून उपदेश घेऊन मला आत्म्याची ओळख झाली होती. त्यामुळे मी भक्तीत तल्लीन झालो होतो. परंतु भक्तीमध्ये आत्मा हाच परमात्मा आहे; अशी मान्यता होती. तीच सत्य मानून मीदेखील पुढे लोकांना तोच उपदेश करीत होतो. मी श्रीकृष्णाला परमात्मा समजत होतो कारण मी गीतेचे अध्ययन केले होते; त्यामुळे घरीच राधा-कृष्णाचे मंदिर बांधून त्याची मनोभावे पूजा-अर्चना करीत असे. माझी भक्ती पाहून, माझ्या गुरूंनी मला गुरुची गादी दिली होती. माझे सुमारे ३०० शिष्य होते. मी सगळ्यांना कीर्तनाच्या माध्यमातून भक्तीचा महिमा सांगत असे. असे करता-करता सुमारे चाळीस वर्षाचा काळ लोटला. भक्तीच्या या विस्तारात मी पुरता गुरफटून गेलो होतो. गुरुची गादी असल्याने, सर्वांकडून मान-शान देखील प्राप्त होत होता. **परंतु माझ्या मनात एक प्रश्न असे की श्रीकृष्ण जर परमात्मा आहे तर अन्य धर्मात त्याला मान्यता का नसावी? इतर धर्मात तर निराकार परमात्म्याची मान्यता आहे. भक्ति-मार्गातही अनेकांना हा प्रश्न पडतो की परमेश्वराचे नेमके रूप कोणते?** हा प्रश्न त्यांना न सुटल्याचे, पुढील अभंगावरून स्पष्ट होईल, 'तुज सगुण म्हणो की निर्गुण रे। सगुण निर्गुण एक गोविंदु रे।'

सुमारे ४० वर्षानंतर सन २००१ मध्ये मला माझ्या भक्तीचे फळ मिळाले व माझ्या मनातील सर्व प्रश्नांची उत्तरे मला मिळाली. हे सगळे घडले तेही ड्रामानुसार. एकदा ब्र.कु.अंबालाल भाऊ निमकर हे माझ्याकडे आले व मला सांगू लागले की परमात्मा सृष्टीवर आला आहे. त्याला भेटण्यासाठी माउंट आबूला याल का? मी अतिशय आनंदाने लगेचच होकार दिला. तेव्हा ते म्हणाले की रिझर्वेशन करण्यासाठी १ हजार रूपये द्या. त्याप्रमाणे मी ते दिले. त्यानंतर सेंटरच्या टीचर बहिणीच्या संमतीने आम्ही माउंट आबूला गेलो. तेथे गेल्यावर मी जेव्हा शिव परमात्म्याला (शिवबाबांना) भेटलो तेव्हा मला जो आनंद झाला त्याचे वर्णन मला शब्दात करता येणार नाही. मला आत्मा व परमात्म्यातील महान अंतर लक्षात आले. श्रीकृष्ण परमात्मा नसून, श्रेष्ठ देवता आहे. परमात्मा निराकार आहे. तो एक आहे विभिन्न धर्मात त्यालाच ॐकार, अल्लाह, गॉड, जेहोवा इत्यादी नावांनी संबोधले जाते. तो रचयिता आहे व बाकी सारी त्याची रचना आहे. तोच ३३ कोटी देवी-देवतांचा रचयिता आहे. ब्रह्मा, विष्णू व शंकर या तिन्ही देवांचाही रचयिता आहे. तोच पतितपावन आहे तसेच सृष्टिचक्राचे यथार्थ ज्ञान देणारा आहे. तो ज्योतिर्बिंदू स्वरूप असला तरी सर्व गुणांचा सागर आहे. सर्व आत्म्यांचा परमपिता आणि सद्गतीदाता आहे. अशा अनेक गोष्टी माझ्या लक्षात आल्या. **बुद्धीची कवाडे खुलली व सर्वत्र ज्ञानप्रकाश पसरला. त्याचबरोबर हेही लक्षात आले की आजवर गुरु बनून, आपण लोकांना जे ज्ञान देत आलो ते अयथार्थ वा चुकीचे होते. त्यामुळे त्यांना सत्य ज्ञान देण्याची तळमळ मनी दाटून आली.**

शिवबाबांना भेटल्यानंतर रात्री जेव्हा मी झोपायला गेलो तेव्हा रात्रभर सुष्टिचक्राचे ज्ञान माझ्या बुद्धीत फिरत होते. सुष्टिचक्रात प्रत्येक आत्मा सतोप्रधान, सतो, रजो व तमो या स्थितीतून जात असतो. कलियुगाच्या अंती मनुष्य आत्मा जेव्हा तमोप्रधान बनतो तेव्हा त्याला पुन्हा सतोप्रधान देवता बनविण्यासाठी, परमात्मा अवतरित होऊन, राजयोग शिकवितात, त्यामुळे वर्तमान समय किती मूल्यवान आहे ही गोष्ट लक्षात आली. फलस्वरूप माझ्या मनात फारच बदल घडून आला. मधुबनहून परत भंडारा येथे आल्यावर नियमित सेंटरला जाऊन मुरली ऐकू लागलो. त्याचबरोबर कीर्तनाच्या माध्यमातून भाविकांना ईश्वराचा सत्य परिचय देण्याची सेवा करू लागलो. **'आंधळे हे जन देखवेना डोळा, म्हणोनी कळवळा येतो आम्हा' या अभंगातील करुणेचा भाव मनात भरून राहिला. त्यामुळे मागील १४ वर्षात सुमारे दोन लाख भाविकांना ईश्वरी संदेश देण्याची सेवा**

माझ्या हातून घडली. त्यातून सुमारे ५० ठिकाणी गीता पाठशाळा अथवा सेंटर्स उघडली गेली. खरोखर जीवन धन्य धन्य झाले!

'देव पहावया गेलो, देव होऊनिया ठेलो' अशी अवस्था प्राप्त झाली. ईश्वरी ज्ञानाचे अमृत भाविकांना कीर्तनाच्या माध्यमातून सतत देत राहिल्याने मीदेखील ज्ञानसागरी पूर्णपणे डुंबून गेलो. माझे लौकिक नाव 'भैय्या' असे आहे परंतु आता सर्वच आत्मे भाऊ-भाऊ असल्याने (मी ही भैय्या, तू ही भैय्या) विश्वबंधुत्वाची भावना अनुभवाला येत आहे. सर्व आत्म्यांविषयी प्रेमाची भावना, शुभभावना व कल्याणाची भावना नॅचरल स्वरूपात मनात भरून उरली आहे. आधी मी कीर्तनात सांगत असे, 'विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म। भेदाभेद वर्म अमंगल।' परंतु आता लक्षात आले, 'आत्ममय जग, ब्राह्मणांचा धर्म। भेदाभेद वर्म अमंगल।' त्यामुळे संगमयुगी ब्राह्मण जीवनात जाती, धर्म, भाषा, संस्कृती हे सर्व भेद संपुष्टात आले. स्मृती, दृष्टी, वृत्ती व कृती पवित्र बनत गेली. स्थिती निराकारी, निर्विकारी व निरहंकारी बनत गेली. आधी माझी भूमिका गुरुची असल्याने, सर्वजण चरणवंदन करीत परंतु आता आत्मभाव जागृत झाल्याने, या सर्व गोष्टी संपुष्टात आल्या. **संगमयुगात परमात्मा शिव पिता जसा सर्व आत्म्यांचा आज्ञाधारक सेवक बनला आहे तसेच मीही विश्वसेवाधारी बनून ज्ञानदान करण्यातच खरा आनंद अनुभवू लागलो. 'भाग गेला, शीण गेला, अवघा झालासे आनंद!' अशी आनंदपूर्ण स्थिती झाली.** त्याचा परिणाम असा झाला की सध्या माझे वय ७८ वर्षाचे आहे परंतु एखाद्या २५ वर्षाच्या तरुणाइतका उमंग-उत्साह तसेच स्थायी खुशी अनुभवाला येते.

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे कीर्तन हे समाज प्रबोधनाचे अतिशय सशक्त माध्यम आहे. आजवर कित्येक संतांनी पाच माध्यमाचा वापर करून जन-सामान्यांपर्यंत भागवत धर्माचा प्रसार केला. आजवर त्यात केवळ भक्तिरस भरलेला होता. आता आपण जर त्यात ज्ञानरस भरला तर समाज परिवर्तनाचे कार्य झपाट्याने होऊ शकेल. हा दृष्टिकोन लक्षात घेऊन मी ज्ञानावर आधारित विषय माझ्या कीर्तनासाठी घेतो. उदाहरणार्थ, मनुष्यांच्या ८४ जन्मांची कहाणी, भविष्य २१ जन्माची बादशाही कशी मिळवाल? सुखी जीवनाचे रहस्य, तणावमुक्त जीवनाची गुरुकिल्ली, परमपिता शिव परमात्म्यांचे चरित्र, सात्विक आहाराचे महत्व, खऱ्या परमेश्वराला ओळखा, पतितपावन शिव भगवान, सृष्टीच्या आदि, मध्य व अंताची कहाणी, देव व्हा कोणी, देव व्हा कोणी, खरा कुंभमेळा, संगमयुग हाच पर्वणीचा काळ, इत्यादी. त्यामुळे मोठ्या संख्येने भाविक भक्तगण कीर्तनाला येतात व ईश्वरी ज्ञानाचा प्रसाद सोबत घेऊन जातात.

कीर्तनाच्या शेवटी मी जेव्हा त्यांना समजावून सांगतो की परमात्मा शिव पिता या सृष्टीवर अवतरित झाला आहे. त्याला 'याचि देही, याचि डोळा' तुम्ही भेटू शकता. मी स्वतःदेखील भेटून आलो आहे. हे ऐकल्यावर जे खरे भक्त आहेत त्यांना खूपच आनंद होतो. त्यांना आपले जीवन सफल होण्याची वेळ आली आहे, असे वाटते. त्यानंतर मी त्यांना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालयाचा परिचय देऊन तेथे जायला सांगतो. त्याप्रमाणे ते मोठ्या आनंदाने तेथे जातात व त्यांना आपल्या भक्तीचे फळ म्हणून ईश्वरी ज्ञान प्राप्त होते.

अशाप्रकारची ईश्वरी सेवा माझ्या हातून शेवटपर्यंत घडत रहावी हीच मंगलकामना करतो. असेच परमात्म प्रेम, परमात्म वरदान व परमात्म वारसा सर्व आत्म्यांना प्राप्त होवो. तसेच संगमयुगाचे जे गायन आहे, 'आत्म्यायें परमात्मा अलग रहे बहुकाल। सुंदर मेला कर दिया जब सद्गुरु मिला दलाल।' असे हे मंगलमीलन मधुबन पावन भूमीवर होत राहो, हीच शुभभावना व शुभकामना! शेवटी सकळांना हीच कळकळीची विनंती करतो की परमात्म याद व सेवा यात आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण सफल करा. हीच आपल्या जीवनाची खरी सफलता आहे. आपल्या जीवनाचा एकही क्षण व्यर्थ गमवू नका.

आता तरी पुढे हाचि उपदेश,
नका करू नाश, आयुष्याचा!

संगमयुगात आपण सदैव शिवबाबांशी एकत्रित (कम्बाइण्ड) राहून परमानंदे नाचत राहूया, गात राहूया व ज्ञान-योगाच्या पंखांनी उडत राहूया. लवकरच आपल्या पुरुषार्थाचे जे लक्ष्य आहे, 'बापसमान बनण्याचं' ते गाठूया.

१. मडगाव (गोवा) : सुप्रसिद्ध गायिका सुमनताई कल्याणपूरकर व त्यांची कन्या यांना ईश्वरी संदेश देतांना ब्र.कु. सुरेखा बहेन **२. शांतिवन (आबू रोड)** : ६०० व्ही. आय.पी. ना ७५ गाड्यांतून शिबीरासाठी आणणारे बी. के. नंदू बोरुडे, अहमदनगर यांचा सन्मान करतांना ब्र.कु. गीता बहेन शेजारी ब्र. कु. नंदकिशोर **३. पुनस (लांजा, रत्नागिरी)** : बी. के. सुनिल पाटकर व त्यांच्या धर्मपत्नी बी. के. स्नेहा पाटकर यांना 'कोकण कृषि गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. **४. सोलापूर (सोनपेठ)** : मराठी फिल्म अभिनेत्री निशा परुळेकर यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र. कु. मिरा दीदी **५. संगमनेर** : कॉलेजचे प्राचार्य डॉ. देशमुख यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र. कु. छोटेलाल भाई, भारती बहेन, शेजारी ब्र. कु. पद्मा बहेन **६. वाशी (नवी मुंबई)** : बाल व्यक्तित्व विकास शिबीरात मुलांना आरोग्याविषयक मार्गदर्शन करतांना ब्र.कु. डॉ. रतन राठोड **७. चाळीसगाव** : येथील पोलीस ठाण्यामध्ये ईश्वरी संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत पोलिस अधिकारी तसेच बी. के. भगवान भाई (शांतिवन), बी. के. वंदना बहेन **८. मोहोळ (सोलापूर)** : दिवाणी न्यायाधीश श्री. हंबीरे यांना ईश्वरी भेटवस्तू देतांना ब्र.कु. प्रिया बहेन सोबत तारा दीदी, भिमराव सर व मनिषा बहेन

Registration No. 033000/30/AL/85/NT/11

अहमदनगर : केंद्रीय मंत्री माननीय श्री. रावसाहेब दानवे यांना १०० प्रकारच्या फुलांचा गुलदस्ता देऊन, परमात्मा शिव पिता सृष्टीवर आल्याचा संदेश देतांना ब्र.कु. राजेश्वरी व ब्र.कु. दीपक (सदरचा गुलदस्ता 'अमेझिंग वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंदण्यात आला आहे.)

बांबवडे (कोल्हापूर) : 'शिवसागर' या भव्य वास्तुचे उद्घाटन करतांना ब्र. कु. दिव्यप्रभा बहेन, ब्र.कु. सुनंदा बहेन, ब्र.कु. शोभा बहेन व अशोक सोहनाने

हिंगोली (बांगर नगर) : येथील राजयोग भवनाचे उद्घाटन करतांना ब्र.कु. शीलू दीदी (मधुबन), ब्र.कु. सुनंदा बहेन, ब्र.कु. सोमप्रभा बहेन, ब्र.कु. महानंदा बहेन ब्र.कु. शोभा बहेन, शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष बांगर, माजी नगराध्यक्ष गणेश लुंगे, बी. के. ज्ञानेश्वरभाई व अन्य

माउंट आबू : ग्लोबल हॉस्पिटलमधील ब्र.कु. डॉ. रमेश भाई यांना डॉक्टरेट अवार्ड तसेच जीवन गौरव पुरस्कार प्रदान करतांना डॉ. मेहेर मास्टर मूस व रशियाचे कौंसिलर.